cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३४ | बुधवार, दि.२८ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकावर पण जनता दयनीय अवस्थेत !

भारतीय सैन्य पाकिस्तानच्या विरोधात चांगली कामगिरी करत असताना मोदी सरकारने अचानक शस्त्रसंधी मान्य केल्यामुळे देशभर चौफेर टीकेला सामोरे जावे लागत असलेल्या मोदी सरकारला दिलासा देणारी एक बातमी समोर आली आहे. भारताची अर्थव्यवस्था जगामध्ये पाचव्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर गेल्याचे निती आयोगाने जाहीर केले आहे. मोदी सरकारला आता या बातमीवरून स्वतःची पाठ थोपटून घेण्याची चांगली संधी मिळाली आहे आणि त्याचा ते पुरेपूर वापर करून घेतील.

### छत्तीसगडमध्ये १८ नक्षलवाद्यांचे शस्त्रांसह समर्पण

छत्तीसगडः नियाद नेल्लनार योजनेमुळे प्रभावित होऊन मंगळवारी १८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. त्यापैकी ४ नक्षलवादी बटालियन क्रमांक १ शी संबंधित आहेत, असे सुकमाचे पोलिस अधिक्षक किरण चव्हाण यांनी सांगितले. दक्षिण बस्तरमध्ये सक्रिय नक्षलवाद्यांनीही आत्मसमर्पण केले आहे. आत्मसमर्पण केलेल्यांना राज्य सरकारच्या सुरू असलेल्या सर्व योजनांचे लाभ मिळतील. सर्व नक्षलवाद्यांना आत्मसमर्पण करण्याचे आवाहन चव्हाण यांनी केले.

## थोडक्यात...

### बीडमधील बिंदुसरा नदीला पूर

बीड जिल्ह्यात मध्यरात्री झालेल्या जोरदार पावसाने शहरातून जाणाऱ्या बिंदुसरा नदीला पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. नदीपात्राची स्वच्छता न केल्याने नदीपात्रातील झाडे आणि कचरा पुलाला अडकल्याने शहरातील दगडी पुलावरून पाणी वाहत होते. त्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती.

### आयटीआर भरण्याची अंतिम तारीख वाढवली

मुंबई–आयकर विभागाने २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी आयटीआर दाखल करण्याची अंतिम तारीख ३१ जुलैवरून १५ सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे. आयकर विभागाच्या या निर्णयामुळे लाखो लोकांना दिलासा मिळणार आहे.

### शरद पवार जास्त कोणाबरोबर टिकत नाहीत– नारायण राणे

मुंबई–नारायण राणे यांनी नुकताच पत्रकार परिषद घेतली. वेळी ते म्हणाले की, जर ते अजित पवार यांच्या बरोबर आले तर साहजीकच आमचा फायदा होईल. आमचा पक्ष मोठा आहे. आम्ही ठरवू काय आणि कसे करायचे, असे ते म्हणाले.

### महाराष्ट्रात कोरोनाचे ७८७ रुग्ण, तर ५ जणांचा मृत्यू

मुंबई–देशात करोना झपाट्याने वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक ७८७ रुग्ण आढळले असून ५ जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. तर एकूण देशात बघायचे झाले तर देशात कोरोनामुळे आतापर्यंत १० जणांचा मृत्यू झाला आहे तर १ हजार ४५ रुग्णांची नोंद आढळली आहे.

### संजय शिरसाट यांच्या मुलाविरोधात गंभीर आरोप

संभाजीनगर–कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट यांच्या मुलाविरोधात गंभीर आरोप, फसवणूक केल्याचा तसेच मानसिक–शारीरिक छळ केल्याचा गंभीर आरोप विवाहीत महिलेने केला आहे. दरम्यान सदरील मुलीने आपण तक्रार मागे घेणार असल्याचे म्हटले आहे.

### ५ हजार एसटी ई–बस कंत्राट रद्द करण्याच्या सूचना

मुंबई–एसटी महामंडळाच्या भाडे तत्वावर ५,१५० इलेक्ट्रिक बस पुरवण्याच्या कंत्राटासाठी जबाबदार असलेली कंपनी निष्क्रिय ठरल्यामुळे तिच्याशी केलेले कंत्राट रद्द करण्यासाठी आवश्यक ती कारवाई करावी, असे निर्देश राज्याचे परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

### एमपीएससीची परीक्षा

पुणे–महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा मुख्य परीक्षा दि. २७ मे रोजी सुरु झाली असून दि. २८ व २९ मे रोजी दोन दिवस परीक्षा होणार आहे. सकाळी ९ ते १२ व दुपारी ४ ते ६ या दोन सत्रात परीक्षा घेतल्या जाणार आहे. परीक्षा सेंटरच्या हद्दीत मनाई आदेश लागू करण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांना नुकसानीचे तातडीने हेक्टरी ५० हजार द्या

## काँग्रेसची सरकारकडे मागणी; भाजीपाला, फळ बागांचे नुकसान



मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी संकटाचा सामना करत असतानाच मुसळधार पावसाने पुन्हा त्याला संकटात टाकले आहे. या पावसाने शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून हातातोंडाशी आलेले पिकही वाहून गेले आहे. निसर्ग लहरी झाला असून राज्यातील फडणविसांचे सुलतानी सरकार शेतकरी व जनतेच्या मुळावर उठले आहे. संकटातील शेतकऱ्याला मदतीची गरज असून सरकारने पंचनाम्याचे सरकारी सोपस्कर बाजूला ठेवून नुकसानग्रस्तांना एकरी २० हजार रुपये मदत तातडीने द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

गांधी भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, बळीराजा संकटात आल्यास त्याला तातडीने मदत करण्याचे काम काँग्रेसचे सरकार असताना अनेकदा केले आहे. पिकावर रोग पडला, लाल्या पडल्या, गारपीट झाली, अवकाळी पावसाने नुकसान झाले की सरकारने कशाचीही पर्वा न करता शेतकऱ्याला मदत दिली आहे. आताचे सरकार मात्र शेतकऱ्याला मदत करण्याच्या विचाराचे नाही. केवळ पंचनामे करण्याचे आदेश देऊन, कोरडी आश्वासने देऊन चालणार नाही, शेतकऱ्यांना तातडीने मदत पोहचवली पाहिजे. खरिप हंगामाच्या सुरुवातीलाच मोठे संकट आल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. कर्जमाफी अद्याप जाहीर केलेली नाही, कर्जाचे पुनर्गठन तरी करून द्यावे. सरकारचे खरिपाचे काहीच नियोजन नाही याकडेही ◀◀ पान २ वर

# शेतजमीन वाटणीपत्राची दस्त नोंदणी फी माफ

## मंत्रिमंडळाचे १० धडाकेबाज निर्णय!

मुंबई । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये अंशकालीन निदेशकांच्या नियुक्तीच्या सुधारीत धोरणास मान्यता देण्यात आली आहे. तसेच शेतजमीन वाटणीपत्राची दस्त नोंदणी फी माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

◀◀ पान २ वर

### “ फक्त पाचशे रुपयामध्ये शेतीचा वाटणी होणार

महसूल खात्यामध्ये एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीची आपसामध्ये वाटणी करायची असेल तर एकूण रेडीरेकनरच्या एक टक्के किंमत मोजावी लागायची. आता त्यामध्ये बदल करण्यात आला आहे. आता फक्त ५०० रुपयांमध्ये ही वाटणी केली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. या आधी शेतीच्या वाटणीपत्राच्या दस्तासाठी मोठी रक्कम मोजावी लागायची.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील १० निर्णय पान २ वर

## शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

# गढी परिसरात अपघात, ६ जणांचा मृत्यू




बीड । प्रतिनिधी

बीडच्या गढी परिसरात रात्री उशिरा झालेल्या भीषण अपघातात गेवराईतल्या सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची घटना गढी इथल्या छत्रपती संभाजी महाराज चौकाजवळ घडली. दरम्यान दि. २७ मे रोजी सर्वच मयत तरुणांवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

गेवराई शहरातील काही नागरिकांची चारचाकी गाडी गढी परिसरात तांत्रिक बिघाडामुळे बंद पडली होती. त्यामुळे हे सहा जण गाडी आणण्यासाठी त्या ठिकाणी गेले होते. तेव्हा भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरने थेट कारला जोरदार धडक दिली. या धडकेत सर्व सहाजणांचा जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की गाडीचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस व आपत्कालीन पथक घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह स्थानिक रुग्णालयात हलवण्यात आले असून, अपघातग्रस्त कंटेनर चालक घटनास्थळावरून फरार झालाय. पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला असून दि. २७ मे रोजी सर्वच मयत तरुणांवर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# योग्य वेळेला, योग्य निर्णय घेणार...

## राज ठाकरेंचा कार्यकर्त्यांना कानमंत्र, एकत्रिकरणाच्या चर्चेला उधाण!

नाशिक । प्रतिनिधी

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नाशिक दौऱ्यावर आलेल्या मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपला नाशिक दौरा तासाभरातच गुंडाळत पुन्हा मुंबई गाठली. या दौऱ्यात ठाकरे यांनी निवडक शिलेदारांसोबत बैठक घेत निवडणुकांच्या तयारीचा कानमंत्र दिला. निष्क्रिय तसेच सक्रिय पदाधिकाऱ्यांवर आता निरीक्षक लक्ष ठेवतील अशा सूचना त्यांनी केल्या.



तसेच मनसे आणि शिवसेनेच्या एकत्रिकरणाबाबत योग्य वेळी योग्य ती भूमिका कळवली जाईल असे सांगत, पक्षहिताचा निर्णय घेतला जाईल असा संदेश ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना दिला.

एकेकाळी नाशिक हा मनसेचा बालेकिल्ला राहिला असून, नाशिककरांनी तीन आमदार आणि महापालिकेतील सत्ता मनसेकडे सोपवली होती. परंतु, स्थानिक पदाधिकाऱ्यांमधील विसंवाद आणि गटबाजीमुळे पक्षाला मोठा फटका सहन करावा लागला. आता ठाकरेंनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे लक्ष वळवले आहे. या निवडणुकांपूर्वी ◀◀ पान २ वर

# शेतकरी बांधवांच्या अडचणींबाबत उपाययोजना करा

## आ.संदीप क्षीरसागरांची शासन, प्रशासनाकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यातील शेतकर्यांच्या विविध अडचणी आणि मागण्यांच्या संदर्भात शासन आणि प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासन अणि प्रशासनाकडे केली आहे.

या आहेत मागण्या

अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी., सन २०२० व २०२३–२४ चा रखडलेला संपूर्ण पिक विमा सरसकट देण्यात यावा. तसेच जे शेतकरी विम्यापासून वंचित राहीले आहेत त्यांना १०० टक्के विमा देण्यात यावा., सन २०२३–२४ मधील अतिवृष्टी अनुदानाची रक्कम तात्काळ शेतकर्यांना वितरीत करावी., शेतीचे जंगली जनावरांपासून संरक्षण करण्यासाठी मदत मिळावी. , खरीप हंगामासाठी लागणारे बी–बियाणे योग्य दरात मिळावेत. तसेच पारदर्शक आणि योग्य पद्धतीने शेतकर्यांपर्यंत पोहोचावेत., बीजोत्पादक व शेडनेट धारक शेतकर्यांचा पीक विमा योजनेत सामावेश करावा. तसेच त्यांना इतर सामान्य शेतकऱ्यांप्रमाणेच



◀◀ पान २ वर

# उन्हाळी कांद्याला पावसाचा फटका

## भावात तेजी येण्याची शक्यता; कांद्याची नासाडी वाढली

बीड । प्रतिनिधी

मे महिन्याच्या सुरूवातीपासून सुरू असलेल्या पावसामुळे मराठवाड्यासह नाशिक परिसरातील उन्हाळी कांद्याचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात कांद्याची नासाडी वाढणार असल्याने दरातही तेजी येण्याची शक्यता आहे.

सतत पाऊस सुरू असल्यामुळे काढणीला आलेला कांदा शेतातून बाहेर काढता आला नाही. कांद्यातील पाण्याचा अंश कमी होण्यासाठी ◀◀ पान २ वर



# यंदा मान्सून एक्स्प्रेस सुसाट!

## जूनमध्ये सरासरीच्या १०८ टक्के पाऊस पडणार

पुणे । प्रतिनिधी

नैऋत्य मोसमी वारे अर्थात मान्सून यंदा वेळेआधीच दाखल झाला. सध्या राज्यात सर्वदूर पावसाचा जोर सुरु आहे. दरम्यान, हवामान विभागाने मंगळवारी (दि.२७) मान्सून हंगामातील पावसाबाबतचा नवा अंदाज जारी केला. संपूर्ण देशभरात यंदा मान्सून हंगामात दीर्घकालीन सरासरीच्या १०६ टक्के पाऊस पडणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. हे प्रमाण ४ टक्के कमी–जास्त असू ◀◀ पान २ वर




# निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना ५ लाखांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगरमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मोठी कारवाई करत निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांना ५ लाख रुपयांची लाच घेताना रंगेहात अटक केली आहे.



शेतजमिनीच्या वर्ग २ ची जमीन वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्यासाठी त्यांनी तक्रारदाराकडून २३ लाख रुपये आधीच घेतले होते. त्यानंतर पुन्हा १८ लाखांची मागणी केली होती, त्यापैकी ५ लाख घेताना त्यांना अव्वल कारकून त्रिभुवन यांच्यामार्फत पकडण्यात आले. महाराष्ट्रात गेल्या ◀◀ पान २ वर

# केंद्रीय मंत्रिमंडळाची आज बैठक

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली दि. २८ मे रोजी सकाळी ११ वाजता केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला एक महिना पूर्ण झाल्यानंतर ही बैठक होत असून काश्मीरमधील पर्यटनाला चालना देण्याच्या उपाययोजनांवर बैठकीचत चर्चा होण्याची शक्यता आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२६ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६४.५० क्विंटल | २,२७० | ३,००० | २,६३८ |
| ज्वारी/हायब्रिड : ७१.०० क्विंटल | १,९१० | ३,१७० | २,४६४ |
| मका/लोकल:३३.५०क्विंटल | ५,३०१ | ६,७०० | ६,४१७ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,५५० | ६,६०० | ६,५७५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १११.५० क्विंटल | २,२५० | २,६५२ | २,४९० |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: १७.५० क्विंटल | ४,००० | ४,३०० | ४,१६६ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,३५१ | ५,४०० | ५,३७५ |

cmyk

## अग्रलेख

# अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकावर पण जनता दयनीय अवस्थेत!

भारतीय सैन्य पाकिस्तानच्या विरोधात चांगली कामगिरी करत असताना मोदी सरकारने अचानक शस्त्रसंधी मान्य केल्यामुळे देशभर चौफेर टीकेला सामोरे जावे लागत असलेल्या मोदी सरकारला दिलासा देणारी एक बातमी समोर आली आहे. भारताची अर्थव्यवस्था जगामध्ये पाचव्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर गेल्याचे निती आयोगाने जाहीर केले आहे. मोदी सरकारला आता या बातमीवरून स्वतःची पाठ थोपटून घेण्याची चांगली संधी मिळाली आहे आणि त्याचा ते पुरेपूर वापर करून घेतील. देशाच्या अर्थव्यवस्थेचा क्रम वरच्या जागी जाणे ही चांगली बातमी नक्कीच आहे. पण मग त्या अनुषंगाने बाकीचेही प्रश्न आपोआप उपस्थित होतात.

भारत अर्थव्यवस्थेच्या बाबतीत जगात चौथ्या स्थानावर गेल्याने सामान्य माणसाच्या स्थितीत त्याचा नेमका काय परिणाम झाला, किती लोकांचे जीवनमान सुधारले हेही पाहणे महत्त्वाचे ठरते. भारताची अर्थव्यवस्था याआधीही सन २०११ या वर्षी तिसऱ्या क्रमांकावर गेली होती. पण त्या वेळची स्थिती आणि आजची देशाची एकूण आर्थिक स्थिती यात कमालीचा फरक दिसतो आहे. आता बाकीच्या बाबतीत जागतिक क्रमवारीच्या आकडेवारीतच बोलायचे झाल्यास चालू वर्षी जागतिक भूक निर्देशांकात भारताची अवस्था अत्यंत दयनीय असून १२७ देशांच्या यादीत भारत आज १०५ व्या स्थानावर आहे. ग्लोबल हंगर इंडेक्सचा भारताचा स्कोर २७.३ इतका असून तो गंभीर श्रेणीत मोडतो. भारतावरचे कर्जसुद्धा खूप प्रचंड प्रमाणात वाढले आहे. सन २०१४ साली भारतावरचे एकूण कर्ज केवळ सुमारे ५५ लाख कोटी रुपये होते, आज ते सुमारे १७० लाख कोटी रुपये इतक्या प्रमाणात वाढले आहे. भारत जगातली चौथी अर्थव्यवस्था झाला असला, तरी भारतातील जनतेची नेमकी स्थिती दरडोई उत्पन्नावरून लक्षात येऊ शकते. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत भारत आज १९४ देशांच्या यादीत १४२ व्या क्रमांकावर आहे. ही स्थिती निश्चितच देशासाठी भूषणावह नाही. भारत हा प्रचंड लोकसंख्येचा देश आहे, त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झाली असली, तरीही देशातल्या बहुतांश जनतेचे दरडोई उत्पन्न अतिशय अल्प आहे किंबहुना बहुसंख्य जनता आज दयनीय अवस्थेत राहत आहे. म्हणूनच मोदी सरकारला देशातल्या ८० कोटी जनतेला आजही मोफत धान्य पुरवावे लागत आहे.

२०१४ यावर्षी भारताचा जीडीपी दोन ट्रिलियन डॉलरपेक्षा अधिक होता; पण त्यावेळी देशाचा जीडीपी वाढीचा दर ७.४% इतका होता. आज भारताचा जीडीपी चार ट्रिलियन डॉलरपेक्षा अधिक झाला असला, तरी जीडीपी वाढीचा दर केवळ ६.२ टक्क्याच्या आसपास आहे. त्यामुळे भारत चौथ्या क्रमांकावर गेला याचा आपल्याला फार डांगोरा पिटून चालणार नाही किंवा तेवढ्यावर समाधानी राहून चालणार नाही. देशाची खऱ्या अर्थाने आर्थिक प्रगती व्हायची असेल तर देशातील जीडीपी वाढीचा दर किमान आठ टक्क्यावर जाणे आवश्यक आहे. देशातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न किमान दुपटीने वाढण्याची अपेक्षा आहे तरच देशातील बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल आणि जनतेला महागाईवर मात करणे शक्य होईल. जनतेच्या स्थितीत सुधारणा होणे हे आजच्या घडीला फार महत्त्वाचे आहे. भारतामध्ये कमालीची विषमता आहे, या आर्थिक विषमतेत अलीकडच्या दशकात प्रचंड भर पडली आहे. अर्थव्यवस्था सुधारत असली तरी त्याचा लाभ केवळ समाजातल्या मूठभर लोकांनाच होताना दिसत असून सरकारच्या जवळ असणार्या उद्योगपतींच्या उलाढालीत आणि नफ्यातच सध्या वाढ होताना दिसत आहे. ही वाढ सगळीकडे समप्रमाणात झाली तर देशाच्या आर्थिक विकासाचे लाभ सामान्य जनतेलाही होऊ शकतील, परंतु दुर्दैवाने केंद्र सरकारच्या पातळीवर त्यासाठी फार ठोस किंवा भरीव उपाययोजना होताना दिसत नाही, या वस्तुस्थितीकडे आपल्याला डोळेझाक करता येणार नाही. भारताचा जीडीपी वाढीचा दर अपेक्षित प्रमाणात वाढत नसल्याने येत्या काही काळात भारत पुन्हा खालच्या क्रमांकावर जाऊ शकतो ही वस्तुस्थितीही आपल्याला नाकारता येणार नाही. भारताच्या प्रगतीची बातमी मानसिकदृष्ट्या भारतीयांना सुखावणारी असली तरी, त्याचे नेमके परिणाम पदरात पाडून घेण्यासाठी भारतीय जनतेला अजून किती प्रतीक्षा करावी लागणार आहे हा कळीचा मुद्दा आहे. देशाची अर्थव्यवस्था खऱ्या अर्थाने सुधारण्यासाठी जी अन्य महत्त्वाची कारणे आहेत त्याकडेही लक्ष देणे महत्त्वाचे आहे. देशात होणारी थेट परकीय गुंतवणूक हाही एक महत्त्वाचा अँगल त्याच्यामध्ये असतो, पण दुर्दैवाची बाब अशी की रिझर्व्ह बँकेने अलीकडेच जी आकडेवारी जाहीर केली आहे, त्यात चालू वर्षी भारताची थेट परकीय गुंतवणूक तब्बल ९६ टक्क्यांनी घसरली आहे. यावरून विदेशी गुंतवणूकदारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर आता पाहिजे तितका भरवसा राहिलेला नाही हे स्पष्ट जाणवते आहे. एकूण काय तर मोदी सरकारला इव्हेंटबाजीसाठी हा एक नवीन मुद्दा मिळाला आहे एवढीच एक सरकारची जमेची बाजू त्यात दिसते आहे.

## शिक्षणाचे महत्व समजले तर भविष्य उज्वल होईल–जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

तरुणांनी ध्येय प्राप्तीसाठी डोळ्यासमोर टार्गेट ठेवले पाहिजे. त्याशिवाय कोणतेच यश गाठता येत नाही. त्यासाठी प्रत्येकाला शिक्षणाचे महत्व कळाले पाहिजे तरच भविष्य उज्वल होईल असे प्रतिपादन जिल्हाधिकारी श्री पांचाळ यांनी केले.

जालना शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात दि. २६ मे २०२५ रोजी उज्वल संस्थेच्या वतीने महिला सक्षमीकरण अभियान अंतर्गत हिरकणी महोत्सव आयोजित केले होते. यावेळी उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी बोलत होते. दरम्यान व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के, प्रमुख पाहुणे म्हणून जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक सिध्दार्थ माने, शाहीर अप्पासाहेब उगले, छत्रपती शिवाजी महाराज विद्यापिठाचे प्रा. बापूराव बनसोडे, संस्थेच्या अध्यक्षा सौ. करुणा अच्युत मोरे यांची उपस्थिती होती.

## पंकजा मुंडे यांनी केले बनसोडे, स्वामी आणि मुंडे कुटुंबियांचं सांत्वन



**परळी वै । प्रतिनिधी**

**परळी तालुक्यातील नागापूर येथील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते कै. गणपत बनसोडे यांचे नुकतेच दीर्घ आजाराने दु:खद निधन झाले होते, आज परळी दौर्यात पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या परिवाराची भेट घेतली व सांत्वन करत धीर दिला. एक मनमिळावू व धडाडीचा कार्यकर्ता काळाने हिरावून घेतला, त्यांची उणीव भासत राहील अशी भावना त्यांनी व्यक्त केली.**

वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक पद भूषविलेले गणपत बनसोडे हे भाजपचे निष्ठावंत व सच्चे कार्यकर्ते होते. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक म्हणून देखील त्यांनी जवाबदारी निभावली होती. एक मनमिळावू, अनुभवी व सर्वांच्या मदतीला धावून येणारे अशी त्यांची ख्याती होती. आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते असा त्यांचा परिचय सर्वज्ञात होता. एक मनमिळावू व धडाडीचा कार्यकर्ता काळाने हिरावून घेतला, त्यांची उणीव भासत राहील अशी भावना पंकजाताई यांनी व्यक्त केली.तसेच नागापूर येथील शिवदास स्वामी यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई स्वामी यांचे काही दिवसांपूर्वी वृद्धापकाळाने निधन झाले होते, त्यांच्या कुटुंबियांची देखील ना. पंकजाताई मुंडे यांनी सांत्वनपर भेट घेतली. तर नाथरा येथील जेष्ठ नागरिक स्व. वसंतराव धोंडिबा मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. स्वामी आणि मुंडे कुटुंबियांचे सांत्वन करताना ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या शोकसंवेदना व्यक्त करत दोन्ही कुटुंबांना धीर दिला. तसेच यादरम्यान नागापूर, नाथरा येथील ग्रामस्थ नागरिकांशी भेटून ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

# सततच्या संततधार पावसामुळे शेतीची कामे रखडली

## पेरणी तोंडावर; जनावरांना खुरकूतं होण्याची भिती, शेतकरी हतबल

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**मागील आठ दिवसापासून पडत असलेल्या सततच्या संततधार व मुसळधार मुळे दिंद्रुड (ता.माजलगाव) परिसरातील शेतमशागतीची कामे रखडली आहेत. पेरणी तोंडावर आलेली असताना रोजच्या अवेळी येणाऱ्या पावसामुळे शेतकरी हतबल झाला आहे.**



दिंद्रुड, तेलगाव, नित्रुड व मोहखेड महसूल मंडळात मागच्या आठ दिवसात वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात येणाऱ्या पावसाने एक दिवस हि उघडीप दिली नाही. दिवसातून कधीही अवेळी येत असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना जनावरांच्या वैरण-पाण्याशिवाय आणि ओल्या जागेतून कोरड्या जागेत सोड-बांध केल्याशिवाय दुसरं काहीही कामं हाताला राहिल नाही. त्यामुळे शेतात बैलपाळी, कास्या वेचणे, रुटर आदि पेरणीपूर्व मशागतीची कामे रखडली आहेत. तर काही शेतकऱ्याच्या शेतातील कापसाची पळाटी जागेवरच उभी आहे. सततच्या पावसामुळे झालेल्या चिखचिखीत जनावरांना खुरकूतं होण्याची दाट शक्यता असते. त्यात कापूस लावणीसाठी रेघाटणी, पेरणी तोंडावर आली अन्? मध्येच अशी संकटं उभी राहिल्यास काय? या भितीने शेतकरी हतबल झाला असून, पुढील दोन-चार दिवसात पाऊस थांबला तर शेतीची मशागत व राहिलेली अर्धवट कामे करायला शेतकऱ्यांना वेळ मिळू शकतो. दिंद्रुडसह चारही महसूल मंडळात दररोज अधून-मधून पडत असलेल्या पावसामुळे शेतमशागतीची कामे लांबणीवर पडली आहेत. मृगाची पेरणी तोंडावर आलेली असताना, शेतात केवळ वाफसा नसल्यामुळे मशागतीची कोणतीही कामे शेतकरी व मजूरांना करता येत नाहीत.

## उद्या अंबड येथे अविनाश धर्माधिकारी यांचे अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर विशेष व्याख्यान

अंबड । प्रतिनिधी

येथे अविनाश धर्माधिकारी यांचे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर विशेष व्याख्यान अविनाश धर्माधिकारी हे माजी भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी आहेत. आयएएसमध्ये सामील होण्यापूर्वी ते एक प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते आणि फ्री-लान्स पत्रकार होते. आपल्या दहा वर्षांच्या प्रशासकीय कारकिर्दीत विविध पदांवर काम केल्यानंतर त्यांनी १९९६ मध्ये आयएएस पदाचा राजीनामा दिला राजीनामा देताना ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे उपसचिव होते. ते इ.स. १९८६ साली भारतीय प्रशासकीय सेवेत दाखल झाले. त्यांनी फलटण येथे विभागीय उपायुक्त, रत्नागिरी आणि अमरावती जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी, रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मनोहर जोशी यांचे सचिव, अशा महत्त्वाच्या पदांचा कार्यभार सांभाळला. त्यांनी मार्च १, इ.स. १९९६ रोजी सेवेचा राजीनामा दिला आणि त्यानंतरपुण्यात चाणक्य मंडल परिवार ही यू.पी.एस.सी आणि एम.पी.एस.सी. या स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारी प्रशिक्षण संस्था स्थापन केली.धर्माधिकारी यांच्या सामाजिक, शैक्षणिक कार्याची देखल घेऊन पुण्यातील सार्वजनिक संस्थेने त्यांचा २०१५ मध्ये 'सार्वजनिक काका पुरस्कार'ने गौरव केला.

अशा प्रकारचे व्यक्तिमत्व असलेले श्री अविनाश धर्माधिकारी यांचे दिनांक २९ मे रोजी सकाळी १०:३० वाजता पंडित गोविंदराव जळगावकर नाट्यगृहात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन पटावर प्रशासकीय दृष्टीकोनातून आपल्या व्याख्यानातून प्रकाश टाकणार आहे. सदरील कार्यक्रमाचे आयोजन मुख्याधिकारी व कर्मचारी वर्ग नगर परिषद अंबड यांनी केले असून सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबड बदनापूर विधानसभेचे आमदार श्री नारायण भाऊ कुचे हे राहणार आहे तरी शहरातील सर्व नागरिकांनी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरून...

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील १० निर्णय

रायगड जिल्ह्यातील पेण येथील सुहित जीवन ट्रस्च्या एकलव्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्रास कार्यशाळेस तसेच,पदांना मान्यता. (दिव्यांग कल्याण विभाग), शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील न्यायिक अधिकाऱ्यांसाठी टंकलेखकाची पदे निर्माण करण्यास मान्यता.(विधि व न्याय विभाग), इचलकरंजी व जालना महानगरपालिकांना वस्तू व सेवा कर भरपाई अनुदान देण्यास मान्यता. इचलकरंजीला ६५७ कोटी , जालन्याला ३९२ कोटी पाच वर्षांत मिळणार (वित्त विभाग), शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तास लागणारी नोंदणी फी माफ. (महसूल विभाग), पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर यांना देण्यात आलेल्या जमीनीबाबतच्या अटी-शर्तीमध्ये बदल करण्यास मान्यता. (महसूल विभाग), फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि. मधील १ हजार ३५१ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मंजूरी (वने विभाग ), स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये अंशकालीन निदेशकांच्या नियुक्तीच्या सुधारीत धोरणास मान्यता. (शालेय शिक्षण विभाग), अशियाई विकास बँक सहाय्यित ''महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प'' संस्थेवर पणन मंत्री पदसिध्द अध्यक्ष राहणार. (पणन विभाग), कृषि पर्यवेक्षक व कृषि सहायक यांच्या पदनामात ''उप कृषि अधिकारी'' व ''सहायक कृषि अधिकारी'' असा बदल (कृषि विभाग ), महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाच्या नागपूर येथील १९५ कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी मंजूर (वस्त्रोद्योग विभाग)

# पत्नीशी अनैतिक संबंध असल्याचा मित्राचा संशय

## भाटुंबा येथील दगडू धपाटे यास झाडाला बांधून केलेल्या मारहाणीत मृत्यू, एक जण जखमी

**केज । प्रतिनिधी**

**तालुक्यातील भाटुंबा येथील दगडू उर्फ आण्णा ज्ञानेश्वर धपाटे वय २७ वर्षे हा आपल्या मित्रासह दुचाकी वरून जात आसताना त्याची दुचाकी त्याचा मित्र आसलेल्या सावळेश्वर (पैठण ) येथील वैभव मस्के याने मामाच्या शेतात घ्यायला लावली. व या ठिकाणी मामाच्या शेताच्या बांधावरील एका झाडाला बांधून त्याला सात जणांनी लाकडी काठीने व चमड्याच्या बेल्टने मारहाण करुन औरंगपूर शिवारातील पवनधाम मंदिराच्या परिसरातील एका रस्त्याच्या कडेला टाकून देण्यात आले.उपचारासाठी त्याला अंबाजोगाई येथील स्वराती रुग्णालयात दाखल केले आसता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मयत घोषित केले.**

केज तालुक्यातील भाटुंबा येथील दगडू उर्फ आण्णा उर्फ ज्ञानेश्वर दत्तात्रय धपाटे वय २७ वर्षे हा सोमवारी (दि. २६ ) सायंकाळी साडेचार वाजता त्याचा त्याचा मित्र सचिन करपे सह दुचाकीवरून जात आसताना, सावळेश्वर (पैठण) येथील रोहन उर्फ रोहित मस्के , वैभव उर्फ सोन्या मस्के व लाडेगाव येथील सुहास पाटोळे, राजेश जंगले, अन्वर पठाण, आशिष अंबाड यांनी त्यांची दुचाकी अडवून त्या दोघांनाही रोहन मस्के यांच्या मामाच्या शेतात घेऊन गेले. तेथे त्याला शेताच्या बांधवरील एका झाडाला बांधून या सात ते आठ जणांनी लाकडी काठी आणि चमड्याच्या बेल्टने अमानुष मारहाण केली. त्यानंतर अविवाहित आसलेल्या दगडू धपाटे याला जखमी व बेशुद्धावस्थेत औरंगपूर शिवारातील पावनधाम मंदिर परिसरातील रस्त्याच्या कडेला टाकून दिले व सर्व जण पळून गेले. प्रकरणी मयताचा भाऊ सिद्धेश्वर धपाटे रा भाटुंबा याच्या फिर्यादी वरून युसुफवडगाव पोलिस ठाण्यात मंगळवारी दुपारी सात अरोपी विरुद्ध खुनाचा गुन्हा गुन्हा नोंद करण्यात आला आसून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे हे करीत आहेत. मारहाण करणाऱ्यां आरोपीनी दगडू उर्फ आण्णा उर्फ ज्ञानेश्वर दत्तात्रय धपाटे याच्या भ्रमणध्वनी वरून त्याचा भाऊ सिद्धेश्वर धपाटे याला ही सर्व माहिती दिली. व तेथून या सर्वांनी पोबारा केला.काही वेळातच सिद्धेश्वर धपाटे आणि गावातील काही लोकांनी दगडू उर्फ आण्णा उर्फ ज्ञानेश्वर दत्तात्रय धपाटे आणि त्याचा मित्र सचिन करपे या दोघांनाही अंबाजोगाई येथील स्वराती रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरु आसताना काही वेळातच दगडू उर्फ आण्णा उर्फ ज्ञानेश्वर दत्तात्रय धपाटे हा मयत झाल्याचे त्याच्यावर उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले. तर सचिन करपे याचेवर तेथेच उपचार सुरु आहेत. या प्रकरणातील अरोपी पैकी रोहन उर्फ रोहित मस्के, वैभव उर्फ सोन्या मस्के रा सावळेश्वर (पैठण), सुहास पाटोळे, राजेश जंगले, अन्वर पठाण, रोहित धीरे, तिघेही रा लाडेगाव या सहा आरोपीना त्यांच्या घरातून व शेतातून जेरबंद केल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे यांनी दिली. दरम्यान या प्रकरणातील आशिष अंबाड रा लाडेगाव हा अद्याप फरार आहे. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे, पोलीस उपनिरीक्षक राहुल पतंगे यांनी घटनास्थळी व स्वराती रुग्णालयात भेट देऊन मयाताच्या नातेवाईकचे जवाब नोंदविले. दरम्यान मंगळवारी दुपारी ३ वाजण्याच्या दरम्यान दगडू धपाटे याचे पार्थिवावर भाटुंबा येथे अंत्य संस्कार करण्यात आले. असल्याची माहिती सरपंच सचिन धपाटे यांनी दिली.



पान १ वरून...

### नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना

लक्ष वेधून अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी मोफत बियाणे व खते द्यावीत, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

-----------------

### शेतजमीन वाटणीपत्राच

राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली असून त्यामध्ये १० मोठ्या निर्णयावर मोहोर लावण्यात आली आहे. राज्यात यापुढे शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तास लागणारी नोंदणी फी माफ करण्याचा मोठा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. तसेच इचलकरंजी आणि जालना महानगरपालिकांना वस्तू व सेवा कर भरपाई अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

------------

### शेतकरी बांधवांच्या अडचणींबाबत

शासकीय नुकसान भरपाई मिळावी. , बीज उत्पादक कंपन्यांना शेडनेट धारक शेतकऱ्यांच्या बाबत हिताचे निर्णय घेणे बंधनकारक करावे., शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य जास्त भाव देण्यात यावा., शेतकरी बांधवांना सोलार पंप उपलब्धतेसाठी सुनियोजन व्हावे. , कपाशी पिकाला किमान १२ ते १४ हजार रुपये प्रति क्विंटल तर सोयाबीन पिकाला ८ ते १० हजार रुपये प्रति क्विंटल भाव देऊन आर्थिक सहकार्य करावे., शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देऊन आर्थिक बळकटी द्यावी. तसेच नवीन पीक कर्ज देण्यासाठी बँकाना तातडीने सुधारीत आदेश द्यावेत.

----------------

### योग्य वेळेला, योग्य निर्णय

पक्षाला उभारी देण्यासाठी राज ठाकरे सक्रिय झाले असून त्यांनी मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक पट्ट्यात पक्षाची पुनर्बांधणी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर दोन आठवड्यापासून ठाकरेंच्या नाशिक दौऱ्याची चर्चा होती. ठाकरे येणार यासाठी पदाधिकारी, शाखाध्यक्ष, विभाग अध्यक्ष आणि मनसैनिक साडेनऊ वाजताच येऊन बसले होते. मात्र, त्यांची चांगलीच निराशा झाली. ठाकरेंनी तासाभराच्या दौऱ्यात निवडक शिलेदारांसोबत बैठक घेत बंद दाराआड निवडणुकीचा कानमंत्र दिला.

------------

### निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना ५ लाखांची

काही महिन्यांत सरकारी अधिका-यांकडून लाच घेण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. ग्रामसेवकांपासून ते तहसीलदारांपर्यंत अनेकांना एसीबीने कारवाई करत ताब्यात घेतले आहे. अलीकडेच परभणी येथे एका महिला क्रीडा अधिका-यालाही लाच घेताना अटक झाली होती. आता छत्रपती संभाजीनगरमधील या प्रकरणाने पुन्हा एकदा खळबळ उडवली आहे.

-----------

### उन्हाळी कांद्याला पावसाचा

बांधांवर, झाडाखाली ठेवलेला कांदा भिजला आहे. हवेतील आद्रर्तेत अचानक वाढ झाल्यामुळे चाळीतील कांद्याला कोंब येऊन कांदा सडण्याची भिती निर्माण झाली आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यासह नाशिक, धुळे, नंदूरबार, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, सातारा, जळगाव, अमरावती आणि अकोला जिल्ह्यांतही कांदा पिकाचे नुकसान झाले आहे.

--------------

### यंदा मान्सून

शकते. जे एकूणच २०२५ मधील जून ते सप्टेंबर दरम्यानच्या मान्सून हंगामात देशभरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे दर्शवते. मध्य भारत आणि दक्षिण द्वीपकल्पीय भारतात पावसाचे प्रमाण दीर्घकालीन सरासरीपेक्षा जास्त (१०६ टक्के ), वायव्य भारतात सामान्य (९२-१०८ टक्के ) आणि ईशान्य भारतात सरासरीपेक्षा कमी (९४ टक्के) राहण्याची शक्यता आहे. यंदाच्या हंगामात देशातील बहुतांश शेती क्षेत्रांचा समावेश असलेल्या मान्सून कोअर झोन मध्ये पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा जास्त (१०६ टक्के) असण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. मान्सून कोअर झोनमध्ये मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिशा आणि आजूबाजूचा भाग येतो. हा भाग मान्सून हंगामात पडणाऱ्या पावसावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. हा पाऊस शेतीसाठी महत्त्वाचा आहे.

**मराठवाड्यात सर्वाधिक ११२ टक्के पावसाचा अंदाज**

संपूर्ण पावसाळ्यात म्हणजेच जून ते सप्टेंबर काळात महाराष्ट्रात सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज आहे. महाराष्ट्रात सरीसरीच्या १०६ टक्क्यांपेक्षा अधिक पावसाचा अंदाज आहे. मान्सून काळात राज्यात यंदा मराठवाड्यात सर्वाधिक सरासरीच्या ११२ टक्के पावसाचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्रात ११० टक्के, विदर्भात १०९ टक्के आणि कोकण तसेच गोव्यात १७ टक्के पावसाचा अंदाज आहे. तर जून महिन्यातही राज्यात चांगल्या पावसाचा अंदाज आहे. जून महिन्यात राज्यातील बहुतांशी भागात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे. तर काही भागात सरासरी पाऊस राहील, असाही अंदाज हवामान विभागाने दिला.

-------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. २८ मे २०२५



## अनिल जाधवर यांचा सेवापूर्ती सोहळा

बीड । प्रतिनिधी

प्राथमिक पदवीधर शिक्षक अनिल संपत्ती जाधवर हे दि. ३१ मे रोजी सेवानिवृत्त होत असून त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन दि. २९ मे रोजी करण्यात आले आहे. तरी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले.



शिक्षक अनिल जाधवर यांचा सेवापूर्ती सोहळा हॉटेल नीलकमल येथे सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आला असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिक्षण अधिकारी भगवान फुलारी तर प्रमुख अतिथी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारीआदित्य जीवने, प्रकल्प अधिकारी संगीता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे, अप्पर निबंधक राजेश जाधवर, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, लेखा वित्त अधिकारी सुरेश केंद्रे, काँग्रेसचे दादा मुंडे, प्राचार्य डॉ. विक्रम सारूक, प्राचार्य खुशालराव मुंडे, प्रा.भाऊसाहेब सानप, उपलेखा वित्त अधिकारी संजय नागरगोजे, उपशिक्षणाधिकारी मैनाताई बोराडे, उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, शा.पो अधीक्षक रंगनाथ राऊत, गटशिक्षणाधिकारी समंदर खान सह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी शिक्षण प्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले.

# संतोष बीडकर यांनी मासिक संगीत सभा गाजविली

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

भारतीय शास्त्रीय संगीत आणि त्यातील राग संकल्पना खऱ्या अर्थाने शास्त्रयुक्त पण तेवढीच कल्पक. समयानुसार राग ऋतूनुसार राग, एवढेच नव्हे तर स्वरातील कंपन संख्या कमी जास्त करून चित्त वेधणारी राग संकल्पना खऱ्या अर्थाने अप्रतिमच असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. तसेच मिता कडून अपरिमिताकडे, मुर्ता कडून अमूर्तकडे, संख्यात्मक, किमान स्वरातून कल्पकतेच्या अथांग सागरात नेणारी राग संकल्पना भारतीय संगीताची खासियतच म्हणावी लागेल.

भारतीय संगीताला लाभलेली ही देखणी राग संकल्पना खरोखरच आपली वेगळी हुकूमत शास्त्रीय संगीतावर गाजवत आहे आणि अखंड गाजवत राहील, यात नवल ते काय?

संगीत साधना मंचची मासिक संगीत सभा ज्येष्ठ गायक संतोष बीडकर



यांनी गाजविली मैफिलीच्या सुरुवातीला त्यांनी सूर मल्हार ( विलंबित बंदिश गरजत आये आणि त्यानंतर द्रुत तीन तालातील बादरवा बरसन को आये ) आपल्या गायनाची सुरुवात केली.

गमय युक्त तानांनी मैफिलीला वेगळा रंग चढला.

सध्याचे निसर्गाचे रूप रंग पाहता, प्रस्तुत कलाकार मल्हार प्रकारातील काही तरी सादर करतील, याची चाहूल रसिकांना लागली होती आणि त्यानुसारच यनियोजित कलाकारांनी सुर मल्हार गायनास प्रारंभ झाला रसिकांच्या मन इच्छांची पूर्ती झाली.

सूर मल्हार ची काही वैशिष्ट्ये

काफीजन्य हा एक मोसमी राग आहे. रात्रीच्या दुसऱ्या प्रहरी गायला जाणार हा राग.वर्षा ऋतूत कधीही गायला/ वाजविला जातो. या रागात सारंग आणि मल्हार यांचा अनोखामेळ साधलेला आहे. काही गुणिजन या रागास सूरदासी मल्हारअसेही संबोधतात.

निसर्गाची गंम्मत म्हणजे चक्क वैशाखात मान्सूनचे आगमन

काही वेळा निसर्ग सुद्धा कलाकारास राग निवडण्यास प्रवृत्त करतात.

संतोष बिडकर यांनी गायलेल्या सूर मल्हार रागाने समस्त अंबाजोगाई न्हाऊन निघाले. हा केवळ दुरापास्त योगायोग म्हटले तर संयुक्तिक ठरेल. राग सूर मल्हार नंतर राग हंसध्वनी मधील तराना प्रस्तुत कलाकारांनी सादर केला, साधारणता समज असतो की तराणा म्हणजे द्रुत लयीतील गायन पण तराना बंदिशीच्या अंगाने सुद्धा गाता येतो हे, संतोषजींच्या गाण्यातून समजले. म्हणजे कला साधकाने असाही प्रयत्न करायला हरकत नाही.

राग सादरीकरण करताना समप्रकृतीत राग याबद्दल संतोषजीनी जी माहिती दिली ती खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरली. कलाकार ने असे नवीन पाइंडे पाडावेत, रसिक गणांकडून किंवा विद्यार्थी दशेतील भावी कलंकारांकडून अशा प्रथेचे स्वागतच असेल. कारण रागाबद्दल थोडीशी माहिती मिळाली तर, विद्यार्थी त्या अंगाने रागाचे श्रवण करू शकतो.

यानंतर जय गंगे भागीरथी या नाटक गीताने, आणि बालगंधर्व रचित एका नाट्यगीताने संतोष बिडकर यांनी आपल्या गायनाची सांगता केली. एकटा कलावंत रंगमंच गाजवू शकत नाही. त्यासाठी अपेक्षित असते ती योग्य आणि सुसंगत साथ संजय सुवर्णकार यांनी तबल्यावर आणि विश्वजीत धाट यांनी संवादिनीवर साथ केली.


## रात्रीच्या वेळी घरात घुसून चोरट्यांनी लाखोंचा ऐवज पळवला

### पोलीसांनी रात्रीची गस्त वाढवण्याची नागरिकांची मागणी

**नेकनूर । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील नेकनूर गावामध्ये चोरट्यांनी दोन घरांमध्ये चोरी करून लाखोंचा ऐवज लंपास केल्याची घटना मंगळवारी (दि.१९) पहाटे साडेतीन वाजता उघडकीस आली.घटनेची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठले. मात्र, पोलिसांच्या रात्रीच्या गस्तीवरच ग्रामस्थांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.**

बीड तालुक्यातील नेकनूर गावातील सितादेवी वस्ती येथे ज्ञानोबा शिंदे यांच्या घरामध्ये कुलूप तोडून चोरट्यांनी प्रवेश करून घरातील २३ ग्रॅम



सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले.यानंतर चोरट्यांनी त्या घराशेजारी असलेल्या श्रीराम शिंदे यांच्या घराकडे आपला मोर्चा वळवित त्यांच्या घराचे कुलूप तोडून प्रवेश करत कपाटातील रोख रक्कम लंपास केली आहे.दरम्यान,या घटनेमुळे नेकनूर व परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.नेकनूर पोलिस स्टेशन पासून घटनास्थळांचे अंतर केवळ एक किलोमीटरचे आहे.असे असतानाही पोलिसांकडून रात्रीची गस्त होत नसल्याचे यावरून दिसून येत आहे.ग्रामस्थांनी अनेकवेळा गावात रात्रीची गस्त करण्याची मागणी केली आहे.परंतु, या मागणीकडे पोलीसांनी यांनी दुर्लक्ष केल्यामुळे नेकनूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गावांमध्ये चोरी आणि लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

## अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती बीड जिल्हा अध्यक्षपदी शिवाजीराव हिंदोळे पाटील यांची निवड

बीड । प्रतिनिधी

बीड येथे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे प्रदश कार्यकारी अध्यक्ष मा.विनोद आप्पा इंगोले यांच्या निवासस्थानी आज व्यापक बैठकीचे आयोजन केले गेले होते, भष्टाचार निर्मुलन समिती चे संस्थापक अध्यक्ष मा.श्री.प्रदिप पाटील खडापूरकर बाबा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील महिला सक्षमीकरण व महिलांचे विषयी प्रश्न सोडण्यासाठी महिला कार्यकर्त्याची निवड करण्याचे आदेश दिले गेले होते त्यानुसार महिलांच्या धडाडीच्या कार्यकर्त्या जेणेकरून महिलांचे संघटन व महिला विषयी आस्था प्रेम असणाऱ्या सौ.सारिका पाटील यांची महिला जिल्हाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली तर बीड जिल्हा अध्यक्ष मा.शिवाजीराव हिंदोळे, मराठवाडा विभागीय कार्यकारी अध्यक्ष सौ.रूपालीताई



देशपांडे, बीड जिल्हा युवती जिल्हाध्यक्ष कु.समीक्षाताई वाघमारे, या वेळी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष मा.विनोद आप्पा इंगोले, बीड जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव हिंदोळे यांची निवड करण्यात आली,तसेच मराठा महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंके मराठा महासंघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष व पौडूळ विद्यामान सरपंच बापूसाहेब मराडे, भष्टाचार निर्मुलन समिती बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रमेश्वर बप्पा कवचट, राठोड, बालाजी इंगोले , गणेश सुर्वे, बाळासाहेब देवगुडे, पत्रकार,सौ.सीमाताई शिलावंत, सौ.जाधव मॅडम,बंडू आप्पा कोलंगडे,बंडू घोडके, गणेश ढगे,विलास इंगोले, बाळासाहेब भोरे,तसेच मित्र परिवार व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष पदाची धुरा घेतल्यानंतर शिवाजीराव हिंदोळे व सौ. सारिका पाटील यांनी बीड जिल्ह्यात या संघटनेच्या सभासद नोंदणी करून जास्तीत जास्त महिलांचा व पुरुष यात सहभाग करून या सामाजिक कार्याचे धुरा सांभाळून या संघटनेत महिलांचा जास्त सहभाग घ्यावयास पुढाकार घेणार असून भ्रष्टाचार निर्मूलन विषयी ज्येष्ठ कार्यकर्त्याच्या माध्यमातून त्यांच्या मार्गदर्शनाखाली या संघटनेचे चांगल्या पद्धतीने वाटचाल करण्याचा या वेळी आश्वासित केले.

## आ.कदम यांच्यावर कार्यवाही करण्याची मराठी पत्रकार परिषद हल्ला विरोधी कृती समितीची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**नांदेड जिल्ह्यातील पत्रकार संजय सुर्यवंशी यांना बातमी का छापली म्हणत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याचे धमकी देणारे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यावर कार्यवाही करन्याची मागणी मराठी पत्रकार परिषद मुबंई, सलग्न हल्ला विरोधी कृती समिती च्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.**

नांदेड जिल्ह्यातील देशोन्नतीचे पत्रकार व मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष संजय सूर्यवंशी यांनी दिनांक २२ मे २०२५ रोजी ''निवधा तळणी सर्कल मधील २५ गावे २५ तासांपासून अंधारात'' या मथळ्या खाली वृत्त प्रकाशित केले. वास्तविक पाहता या बातमीत आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या नावाचा साधा उल्लेखही नाही तरी सुध्दा कोणाच्यातरी चुकीच्या व्यक्तीच्या गैरसमज करून देण्याच्या प्रकारातून दि. २२/०५/२०२५ रोजी आ बाबुराव कदम यांनी सकाळी ९.२५ वाजता ९८२२२१०००३ या नंबर वरून ७ वेळा तर रात्री ०८:४४ वा. ९४२०४१५९२१ या नंबर वरून भडव्या, हरामखोरा, मादरचौद चुकीच्या बातम्या छापतोस का असे म्हणत संज्या तुला संपुन टाकेल





अशा आर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. लोकशाहीचा चौथा आधार स्तंभ असलेल्या पत्रकारास जिवे मारण्याची धमकी देवून संपवण्याची भाषा करणाऱ्या आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी अशी मागणी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्यमंत्री विश्वस्त मा एस एम देशमुख यांच्या मार्गदर्शना खाली मराठी पत्रकार परिषद मुबंई सलग्न हल्ला विरोधी कृती समिती अंबाजोगाईच्या पुढाकाराने अंबाजोगाई उपविभागीय अधिकारी व पोलीस निरीक्षक अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन यांना देण्यात आलेल्या निवेदना द्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर दत्तात्रय अंबेकर (जिल्हा निमंत्रक, हल्ला विरोधी कृती समिती), गजानन मुडेगावकर (बीड जिल्हा कार्याध्यक्ष, मराठी पत्रकार परिषद), अशोक दळवे (तालुका निमंत्रक हल्ला विरोधी कृती समिती), प्रशांत लाटकर (तालुका अध्यक्ष, मराठी पत्रकार परिषद) (डिजिटल मीडिया परिषदेचे उपाध्यक्ष संजय जोगदंड),यांच्या सह जेष्ठ मार्गदर्शक विरेंद्र गुप्ता, सचिव ज्ञानेश मातेकर, कार्याध्यक्ष पूनमचंद परदेशी, उपाध्यक्ष मारोती जोगदंड, संजय राणभरे, गोविंद खरटमोल, सलीम गवळी, नागनाथ वारद, व्यंकटेश जोशी, वसुदेव शिंदे, गोविंद जाधव, परमेश्वर वैद्य, गणेश चांगिरे, शेख फिरोज, अशोक कोळी, वाजेद शेख आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## कृषिमित्र गजेंद्र बडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची डॉक्टरेट पीएचडी

पुणे । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र, कृषिमित्र गजेंद्र प्रभाकर बडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यावाचस्पती (पीएच. डी.) ही पदवी जाहीर केली आहे. बडे यांनी मराठीतील कृषिविषयक नियतकालिकांचा अभ्यास या विषयावर संशोधन करुन पुणे विद्यापीठाला शोध प्रबंध सादर केला होता. विद्यापीठाने हा शोध प्रबंध स्विकारला आहे. मराठीतील कृषिविषयक नियतकालिकांचा अभ्यास या विषयावर राज्यात याआधी एकही संशोधन झालेले नाही. त्यामुळे या विषयावरील बडे यांचे हे संशोधन राज्यातील एकमेव संशोधन ठरले आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर येथील मराठी संशोधन केंद्रात हे संशोधन करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथील साहेबराव शंकरराव ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली गजेंद्र बडे यांनी हे संशोधन पूर्ण केले. पीएच. डी. ही विद्यापीठाची सर्वोच्च पदवी जाहीर झाल्याबद्दल अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस आणि अहमदनगर महाविद्यालयातील मराठी संशोधन केंद्राचे विभागप्रमुख डॉ. सुधाकर शेलार यांनी गजेंद्र बडे यांचे अभिनंदन केले आहे. गजेंद्र बडे हे मूळचे बीड जिल्ह्यातील दुकडेगाव (ता.वडवणी) या छोट्याशा खेड्यातील एका शेतकरी कुटुंबात जन्मलेले असून, मागील २५ वर्षांपासून पुण्यात पत्रकारिता व साहित्य क्षेत्रात कार्यरत आहेत. दरम्यान, गजेंद्र बडे हे मागील २५ वर्षांपासून पत्रकारिता व साहित्य क्षेत्रात कार्यरत आहेत. बडे यांनी आतापर्यंत विदर्भातील दैनिक देशोन्नतीचे मंत्रालय विशेष प्रतिनिधी, दैनिक पुढारीच्या पुणे आवृत्तीत बातमीदार, उपसंपादक आणि दैनिक सकाळमध्ये बातमीदार व प्रिन्सिपल करस्पाँडंट या पदांवर काम केलेले आहे. बडे यांची आतापर्यंत चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. यापैकी एका पुस्तकाला राज्य सरकारचा उत्कृष्ट वाड्मय तर, एका पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार मिळालेला आहे. याशिवाय पुण्याच्या पत्रकारितेत मानाचा समजल्या जाणाऱ्या पत्रकार वरुणराज भिडे आश्वासक पत्रकारिता पुरस्कारासह केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांचे मिळून १३ पुरस्कार मिळालेले आहेत. याआधी गजेंद्र बडे यांना कृषी क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल के. शंकरनारायणन यांनी ''कृषिमित्र'' या पदवीने गौरविलेले आहे. याशिवाय बडे हे देशातील पहिल्या पत्रकार मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिलेले आहेत.

## उत्कर्ष नगरत पाईप लाईन उपलब्ध करून द्या-रा.कॉ.महिला आघाडीची मागणी



**जालना । प्रतिनिधी**

**शहरातील उत्कर्ष नगर भागात पिण्याच्या पाण्यासाठी पाईप लाईन नसल्याने नागरिकांना विकतच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असल्याने सदरील भागात पाईप लाईन उपलब्ध करून द्या अन्यथा ११ जून पासून महानगरपालिके समोर महिलांच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी महिला आघाडीच्या शहर शाखेच्या वतीने मनपा आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांच्या मार्गदर्शन खाली आज शहर अध्यक्ष रिंकल तायड व मनकर्णा डांगे यांच्या नेतृत्वात उत्कर्ष नगर भागातील महिलांनी महानगर पालिका आयुक्त यांना मागण्याचे निवेदन दिले.त्यामध्ये भागातील पाण्याच्या गंभीर समस्येचा उल्लेख आहे.वार्ड मधील सर्व पाण्याचे सोर्स मधून ४०००पेक्षा जास्त क्षार युक्त पाणी येत असल्यामुळे ते पीता येत नाही, परिणामी नागरिकांना पिण्यासाठी व अंघोळीसाठी विकतचे पाणी घ्यावे लागते . शहरातील हा भाग असूनही या कडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्या मुळे या भागात कावीळ , डायरिया,केशगळती या सारखे रोग उदभवत आहेत. त्यामुळे लोकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. महानगरपालिकेला या पूर्वी पण निवेदनाद्वारे सदरील प्रश्न सोडविण्याबाबत विनंती केली होती .परंतु आपण अद्याप कोणतीही कार्यवाही केली नाही हि गंभीर बाब आहे. या भागातील पाण्याची जैविक व अजैविक तपासणी करण्यात यावी तसेच या भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी पाईप लाईन उपलब्ध करून द्यावी , अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष , महिला आघाडीच्या वतीने दिनांक १० जून २०२५ पासून मनपा समोर महिलांच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल , अशा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर शहरअध्यक्ष रिंकल तायड, माजी नगर सेविका मनकर्णा डांगे,उपाध्यक्ष संगीता रोकडे, वार्ड अध्यक्ष पुष्पाताई राऊत , मीरा हांडे , शोभाताई डॉ . रेणुका खेडेकर,नागे,तेजस्वीनी बुंदेले, अंजली पिसे, मीराताई खरात ,शोभाताई प्रेमभारती , बेबीताई त्रिवेदी, नीता जाधव, वर्षाताई ठोंबरे , दिपालीताई वानखेडे, सुजाता औटे, लक्ष्मीताई केशापुरे, मनीषाताई केशापुरे, शारदा गोकुलवार, मीरा मोहिते, अश्विनी चित्राल, यांच्या सह अनेक महिलाची मोठ्या संख्येने उपस्थित होते.आगामी तीन महिन्यात काम पूर्ण करून पाण्याचा प्रश्न निकाली काढण्यात येईल असे आश्वासन सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे यांनी यावेळी दिले.

पान ६ वरून...

### नवकेशर सुपर किंगची विजयी

पाहिले. तर सामन्याचे बहारदार समालोचन (कॉमेंट्री) ज्योतिराम परळकर यांनी केले. नवकेशर सुपर किंग आणि आर.आर.पॉलिटेक्निक या दोन्ही तुल्यबळ संघात झालेल्या सुरूवातीच्या सामन्यात आर.आर.पॉलिटेक्निक संघाने ८३ धावांचे लक्ष नवकेशर समोर ठेवले होते. नवकेशर सुपर किंग संघाने विजयी सलामी देत २ षटके राखून १३ षटकांत (ओव्हर) ८७ धावा काढून हे आव्हान लिलया पेलत अखेर विजयाची बाजी मारली. या सामन्यात नवकेशर सुपर किंग संघाचे प्रमुख भिमाशंकर शिंदे, कर्णधार धम्मानंद वैद्य, स्टार अष्टपैलू खेळाडू सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ.राजेश इंगोले, प्रा.अनंत कांबळे, विक्रमसेन आगळे, प्रदीप जाधवर, सचिन उपाडे, दर्शन पठाडे, दुर्वांक रघू, नवाजीस अली, ऋषिकेश काटुळे, आज्जू खान, अद्वैत देशपांडे, चेतन माने, आदि शिंदे आणि यश खरात या खेळाडूंनी दिमाखदार कामगिरी करीत उज्वोत प्रिमियर लीग - २०२५ मध्ये विजयी सुरूवात केली आहे. आर.आर.पॉलिटेक्निक संघाने नवकेशर सुपर किंग संघाला १५ षटकांत (ओव्हर) विजयासाठी ८४ धावांचे लक्ष दिले. परंतु, नवकेशर सुपर किंगने २ षटके राखून १३ षटकांत (ओव्हर) मध्ये ८७ धावा काढून सहज विजय मिळवला. हा रोमहर्षक सामना पाहण्यासाठी क्रिकेटप्रेमींनी मैदानावर मोठी गर्दी केली होती. योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या राजमाता जिजाऊ मैदानात सुरू असलेल्या या क्रिकेट स्पर्धा अत्यंत जल्लोषात व अनोख्या उत्साहाच्या वातावरणात सुरू आहेत.

### राजीव गांधी सद्भावना

सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व मानधन असे स्वरूप होते.याप्रसंगी प्रमुख अतिथींचे आनंदग्राम मधील छोट्या चिमुकल्या बालकांनी स्वागत केले.आनंदग्राम बीड येथे दत्ताभाऊ बारगजे व सौ संध्याताई बारगजे हे दोन्ही सेवाभावी दांपत्य एच आय व्ही बाधित ७५ छोट्या बालकांचे संगोपन ,पालनपोषण, शिक्षण आरोग्य सुविधा व एवढेच नव्हे लग्नकार्य इत्यादी सेवाभावी काम अविरतपणे करत आहे, ही बाब समस्त समाजासाठी प्रेरणा घेणारी आहे, असे मत श्री संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावतीचे संत गाडगेबाबा अध्यासनाचे प्रमुख डॉ.दिलीप काळे यांनी पुरस्कार प्रदान करते वेळी प्रमुख अतिथी पदावरून बोलताना व्यक्त केले.

याप्रसंगी आनंदग्रामचा सर्व कर्मचारी वर्ग ,छोटे विद्यार्थी तसेच डॉ.पृथ्वीराज बारगजे व त्यांच्या सहचरणी उपस्थित होत्या.

### महाराष्ट्र सरकार आदिशक्ती

एकल महिला, विधवा, परित्यक्ता यांच्यासाठी संरक्षण आणि मदतीची यंत्रणा उभारली जाईल.

महिला बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबनास चालना दिली जाईल.

महिलांना व कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येईल.

कायदे, योजना व अधिकार याबाबत जनजागृती केली जाईल. बाल संरक्षण, पोषण, आरोग्य व शिक्षण समित्यांद्वारे सर्वसमावेशक विकास साधला जाईल. किशोरींच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी समित्या काम करतील. पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत वृक्षलागवड व त्यांचे संगोपन ग्रामपंचायतीकडून केले जाईल.या अभियानाचे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना ''आदिशक्ती पुरस्कार '' दिले जातील: तालुकास्तर : प्रथम ₹१ लाख, द्वितीय ₹५० हजार, तृतीय ₹२५ हजार, जिल्हास्तर : प्रथम ₹५ लाख, द्वितीय ₹३ लाख, तृतीय ₹१ लाख, राज्यस्तर : प्रथम ₹१० लाख, द्वितीय ₹७ लाख, तृतीय ₹५ लाख, या अभियानामुळे राज्यभर सशक्त, सुरक्षित आणि स्वावलंबी महिला सुरक्षित समाज घडविण्याचा महायुती सरकारने निर्धार केला आहे. त्यांचे स्वागत साऊ एकल महिला पुनर्वसन समिती महाराष्ट्र राज्य चे राज्य निमंत्रक हेरंब दादा कुलकर्णी व बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी केले आहे.

### युवा सेना मराठवाडा

कसलाही मुहूर्त, कोणतेही कारण, कशाचेही औचित्य न साधता एक सामाजिक उपक्रम राबवला आहे. त्यांनी त्यांनी चिंच,नारळ,आंबा,जाम,लिंब,वड, पिंपळ हे झाडे लिंबाजी जाधव, महादेव मतकर (शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख) विलास मस्के, फुलचंद नेवाळे, प्रसाद चव्हाण, कृष्णा जाधव, सचिन गाडे, गणेश नेवाळे, विश्वनाथ जाधव, रामदास कदम यांच्या उपस्थितीमध्ये लावले.

**लावलेले प्रत्येक झाड जगवणार**

आम्ही लावलेले वृक्ष हे एकादा उपक्रम राबवायचा आहे म्हणून लावले नाहीत. लावलेले प्रत्येक झाड जगवण्यासाठी आम्ही मेहनत घेणार आहोत. त्यामुळेच आम्ही चिंच, नारळ, आंबा, जाम,लिंब,वड, पिंपळ यासारखे सावली आणि फळ देणारे झाडे निवडली आहेत.

- अविनाश जाधव, युवा सेना मराठवाडा निरीक्षक

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी**

**जि.जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

npghansawangi@gmail.com ph 02483-271787

जा.क्रं.२०२३/नपघ/जा.प्र./कावी- १०८० दिनांक:- २७/०५/२०

**-: जाहीर प्रगटन :-**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अमीर झमीर शेख रा. ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे नसरीनबी शेख महेबुब रा. घनसावंगी ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं २०९६ दि. २०/०६/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं (२३११) दिनांक. २१/०६/२०२३ रोजी नोंद करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. तेंव्हा नसरीनबी शेख महेबुब रा. ता. घनसावंगी जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. (-) प्लॉट नं. ७८ सि.स.नं ६२२/अ/७८ चे एकुण क्षेत्र १४१.०० चौ.मी जागा ज्याची चतु : सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं. ६२२/३/७७.

पश्चिम :- प्लॉट नं. ६२२/अ/७९.

दक्षिण :- प्लॉट नं. ६२२/अ/७४.

उत्तर :- ६ मीटरचा रोड.

या वरील चतुः सिमा मधील प्लॉटचे क्षेत्र १४१.०० चौ. मी. जागा खरेदीदस्ता आधारे नोंद करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नोंद साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नोंद कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले

स्वाक्षरित/-

मुख्याधिकारी

नगर पंचायत घनसावंगी

cmyk




# काबुली हरभऱ्याचे दर टिकून; कापूस, मूग, गूळ, तसेच टोमॅटो दर तेजीत !

मुगाला चालू हंगामात कमी भाव मिळत आहे. यंदा देशातील मुगाचे उत्पादन वाढण्याचा अंदाज आहे. तसेच आयातही चांगली सुरु आहे. त्यामुळे मुगाच्या भावावर दबाव दिसून येत आहे. चालू हंगामात मुगाने हमीभावाचाही टप्पा पार केला नाही. केंद्राने यंदा मुगाला प्रतिक्विंटल सरासरी ८ हजार ६५२ रुपये हमीभाव जाहीर केला. तर बाजारात सध्या ७ हजार ७ हजार ५०० रुपयांच्या दरम्यान दर मिळत आहे. बाजारातील आवकही पुढील काळात कमी होण्याचा अंदाज आहे. पण उन्हाळी मुगाची आवक पुढे असेल. त्यामुळे मुगाचे भाव पुढील काही आठवडे या पातळीच्या दरम्यानच दिसू शकतात, असा अंदाज व्यापारी व्यक्त करत आहेत.



काबुली हरभरा टिकून : देशात यंदा काबुली हरभऱ्याचे उत्पादन कमी झाले. काबुली हरभऱ्याचा पेरा महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये वाढला होता. मात्र बदलत्या वातावरणाचा पिकाला फटका बसला. मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात पिकाला पोषक थंडीच जाणवली नाही. त्यातच तापमान सरासरीपेक्षा अधिक राहीले. त्यामुळे उत्पादन कमी राहीले. परणामी दरही टिकून आहेत. एप्रिल महिन्यापासून काबुली हरभरा ११ हजार ते १२ हजार रुपयांच्या दरम्यान विकला जात आहे. यापुढील काळात बाजारातील काबुली हरभऱ्याची आवक कमी होत जाईल. मात्र काबुली हरभऱ्याला उठाव चांगला राहील. त्यामुळे काबुली हरभऱ्याचे दरही टिकून राहतील, असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला.

गुळाचे भाव टिकून : देशात यंदा उसाचे उत्पादन कमी झाले. कारखान्यांनाही उसाची टंचाई भासत होती. गुऱ्हाळांनाही यंदा ऊस कमी मिळाल्याचे गुऱ्हाळचालकांनी सांगितले. याचा परिणाम गूळ उत्पादनावर झाला. गेल्यावर्षीपेक्षा यंदाचे गुळाचे उत्पादन कमी असल्याचे व्यापारी सांगत आहेत. त्यामुळे गुळाचे भाव टिकून आहेत. सध्या गुळाला गुणवत्तेप्रमाणे राज्यातील बाजारात ४ हजार ते ४ हजार ५०० रुपयांच्या दरम्यान भाव मिळत आहे. यापुढील काळात गुळाला मागणी वाढत जाऊन दरालाही आधार मिळू शकतो, असा अंदाज गूळ बाजारातील व्यापारी व्यक्त करत आहेत.

टोमॅटो दर तेजीत : टोमॅटो दरातील तेजी आजही टिकून होती. तोडणीला आलेला टोमॅटोचे सततच्या पावसाने नुकसान झाले. यामुळे बाजारातील टोमॅटो आवकही कमी होत आहे. त्यामुळे टोमॅटोच्या भावात सुधारणा दिसून येत आहे. गुणवत्तापूर्ण टोमॅटो अनेक बाजारात २५०० रुपयांपर्यंत विकला जात आहे. तर सरासरी दरपातळी २ हजार रुपयांवर पोचली आहे. यापुढील काळातही टोमॅटोची आवक कमी होणार आहे. त्यामुळे दरातही सुधारणा दिसू शकते, असा अंदाज व्यापारी व्यक्त करत आहेत.

कापूस स्थिर : बाजारातील कापसाची आवक कमी झाली आहे. मात्र दुसरीकडे सीसीआयची कापूस विक्री सुरु आहे. तसेच सुताला उठाव कमी असल्याचे सांगितले आज आहे. त्यामुळे बाजारातील कापूस आवक कमी होऊन देखील कापसाचे भाव स्थिर आहेत. कापसाचा भाव मागील काही दिवसांपासून ७ हजार ३०० ते ७ हजार ७०० रुपयांच्या दरम्यान आहे. यापुढील काळात बाजारातील आवक आणखी कमी होणार आहे. मात्र सीसीआयची कापूस विक्री कायम राहील. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचे भाव दबावात आहेत. याचा परिणाम देशातील बाजारावरही दिसू शकतो. त्यामुळे कापसाचे भावही सध्याच्या पातळीदरम्यान दिसून शकतात, असा अंदाज कापूस बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.

# भारतीय मसाल्यावर नेपाळने घातली बंदी



नवी दिल्ली : भारतीय मसाल्यांवर नेपाळ सरकारने बंदी घातलेली आहे.भारतीय मसाले हे जगभरात त्याच्या चवीमुळे आणि औषधी गुणधर्मामुळे प्रसिद्ध आहेत. हे मसाले वेगवेगळ्या देशात निर्यात होतात.भारतीय मसाल्यात 'एथिलिन ऑक्साइडचे' प्रमाण अधिक आढळल्यामुळे भारतातील २ लोकप्रिय मसाला ब्रँड एव्हरेस्ट आणि एमडीएच यांच्यावर नेपाळ सरकारने बंदी घातली आहे. याआधी सिंगापूर, हाँगकाँग आणि न्यूझीलंड या देशांनी या मसाल्यावर बंदी घातली आहे. या दोन ब्रँडमुळे भारतातील सर्वच मसाला निर्यातदार कंपन्या अडचणीत सापडल्या आहेत. त्यामुळे भारताची मसाला निर्यात ५% घटली आहे.

मसाले दीर्घकाळ टिकावेत यासाठी स्टरलायझेशन आणि एव्हरेस्ट मसाल्यांत ईटीओचे प्रमाण जास्त आढळल्यामुळे भारतीय मसाल्यांबाबत जगभरात प्रतिकूल स्थिती निर्माण झाली आहे. 'फेडरेशन ऑफ इंडियन स्पाइस स्टेक होल्डर्स'चे चेअरमन अश्विन नायक यांनी सांगितले की, भारतातून दरवर्षी चार अब्ज डॉलरचे मसाले निर्यात होतात. मसाले सुरक्षित ठेवण्यासाठी सर्वच देशांत ईटीओचा वापर केला जातो. मात्र त्याचे प्रमाण भिन्न असते.

ईटीओ हे मानवी प्रकृतीसाठी हानिकारक नाही. मुळात ईटीओ हे कीटकनाशक नाही. भारतीय मसाले निर्यात बोर्डाने यावर काही तरी पावले उचलायला हवीत. भारताचे मसाले १७० देशांत निर्यात होतात. ब्रिटनचे खाद्य नियामक 'फूड स्टँडर्ड ऑथॉरिटी' ने एक आदेश जारी करून भारतीय मसाल्यांची तपासणी वाढवली आहे. ब्रिटनमध्ये येणाऱ्या सर्व भारतीय मसाल्यांची आता कीटकनाशक अंश चाचणी केली जाईल.


कॅन्सरचा धोका? : नेपाळचे अन्न तंत्रज्ञान व गुणवत्ता नियंत्रण विभागाचे प्रवक्ते मोहन कृष्ण महाराजन यांनी सांगितले की, एथिलिन ऑक्साइडमुळे कॅन्सर होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे एमडीएच आणि एव्हरेस्ट मसाल्यांच्या आयातीवर नेपाळ सरकारने सात दिवसांची बंदी घातली आहे.

# शेळ्यांचे वजन कमी होण्याची कारणे आणि उपाय

शेळीपालन व्यवसायाचा विचार केला तर प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी शेळ्यांचे पालन केले जाते. परंतु शेळ्यापासून मिळणारे मांस उत्पादन हे शेळ्यांच्या वजनावर अवलंबून असते. परंतु बऱ्याचदा काही कारणांमुळे शेळ्यांचे वजन कमी होते किंवा वाढत नाही व त्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांना फार मोठा आर्थिक फटका बसू शकतो. त्यामुळे शेळ्यांचे वजन कमी होण्याची कारणे आणि त्यावरील उपाययोजना यांची माहिती असने गरजेचे आहे.

शेळ्यांचे वजन कमी होण्याचे कारणे :


शेळ्यांमध्ये बऱ्याच प्रकारचे रोग उद्भवतात व त्यामुळे वजनावर विपरीत परिणाम होतो. दुसरे कारण म्हणजे जेव्हा कळपात शेळ्या राहतात तेव्हा चाऱ्यासाठी एकमेकांमध्ये स्पर्धा निर्माण होते, ही बाब देखील शेळ्यांच्या शरीराचे वजन कमी करण्यास कारणीभूत आहे. कळपामध्ये ज्या शेळ्या थोड्या दुर्बल किंवा विनम्र असतात अशा शेळ्यांचे वजन कमी होते. साहाजिकच कळपातील मजबूत आणि मोठ्या शेळ्या कमकुवत शेळ्यांच्या अन्न आणि जागेवर अधिकचा हक्क सांगतात व आहारात प्रवेश नाकारला जात असल्याने कमकुवत शेळ्यांना चारा व्यवस्थित मिळत नाही व शेळ्यांचे वजन घटते.



या समस्येवर उपाय : शेळ्यांचे व तसेच त्यांच्या जाती व शारीरिक स्थितीनुसार त्यांचे वर्गीकरण करणे नेहमीच योग्य असते. जर शेळ्यांमध्ये दातांची समस्या असेल तर यामुळे देखील वजन कमी होऊ शकते. दातांच्या समस्या मुळे चारा खाण्याच्या आणि गिळण्याच्या सामान्य प्रक्रियेवर विपरीत परिणाम होतो. यामुळे शेळ्यांना पुरेशा चाऱ्यापासून वंचित राहावे लागते. या समस्येवर उपाय म्हणून वजन कमी करण्याच्या तपासणीमध्ये दात परिक्षण करून घेणे महत्त्वाचे असते. दातांची समस्या ही विविध प्रकारच्या खनिजांची कमतरता किंवा फ्लोरोसिसच्या अतिरेकामुळे होत असते. शेळ्यांच्या तोंडाची तपासणी वेळोवेळी करावी. कोबाल्टची कमतरता असली तर शरीराच्या वजनात वाढ होणे थांबते. सेलेनियम हे मेंढी पालन आणि शेळीपालन मध्ये एक महत्त्वाचा घटक आहे. याच्या कमतरतेमुळे मादी प्राण्यांमध्ये गर्भपात आणि प्रजनन संस्थेचे समस्या वाढते. याच्या कमतरतेमुळे कोकरांची कमकुवत वाढ होते व विकास देखील थांबतो. एवढेच नाही तर कोकरामध्ये अचानक मृत्यूचे समस्या देखील दिसून येते. या समस्येवर उपाय म्हणून जनावरांना खनिज मिश्रण पावडर दिले गेले पाहिजे. जोन्स रोग : मेंढी आणि शेळ्यांमध्ये हा जुनाट आजार आहे व हा वजन कमी करण्यासाठी कारणीभूत ठरतो. यामध्ये खाद्य योग्य प्रमाणात खाल्ले तरीही प्रादुर्भावित प्राण्याच्या जबड्यात खाली पाणी जमा होते, अशक्तपणा येतो तसेच मेंढ्यांमध्ये लोकर कमी होते, हगवन इत्यादी लक्षणे दिसतात. शेळ्यांच्या पायाला लंगडेपणा असणे हीदेखील एक समस्या असून हा रोग एका प्राण्यापासून दुसऱ्या प्राण्यांमध्ये पसरतो व वजन कमी करत असतो.

# फ्लॉवर पिकांमधील गड्डा सड रोग

महाराष्ट्रात फ्लॉवर हे एक महत्त्वाचे भाजीपाला पीक आहे, ज्याची लागवड सुमारे १६,००० हेक्टरवर होते. नाशिक, नगर आणि पुणे हे या पिकाचे प्रमुख उत्पादक जिल्हे आहेत. फ्लॉवर पिकांमध्ये अनेक रोगांचा प्रादुर्भाव होतो, त्यापैकी गड्डा सड हा एक प्रमुख रोग आहे. हा रोग पानांवर आणि गड्ड्यांवर दिसून येतो आणि त्यामुळे पिकाचे मोठे नुकसान होते. लक्षणे: सुरुवातीला जुन्या पानांवर तपकिरी रंगाचे ठिपके दिसून येतात. हळूहळू हे ठिपके अर्धा इंचापर्यंत वाढू शकतात आणि एकमेकांभोवती पडलेल्या वर्तुळाप्रमाणे दिसतात. कालांतराने नवीन पानांवरही हे ठिपके दिसून येतात आणि पाने वाळून गळून पडतात. फ्लॉवरच्या गड्ड्यांवर काळसर रंगाचे ठिपके दिसू लागतात आणि हळूहळू संपूर्ण गड्डा काळसर होतो.



रोगाचे कारण: हा रोग अल्टरनेरिया ब्रासिसिकोला नावाच्या बुरशीमुळे होतो. हा रोग बीजाणूंद्वारे बियाणे, जमीन आणि पिकांच्या अवशेषांमधून पसरतो. आर्द्रता आणि तापमान: ८५ ते ९० टक्के आर्द्रता आणि २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमान या रोगासाठी अनुकूल आहे. इतर घटक: पाण्याचा ताण, अन्नद्रव्यांची कमतरता, किडींचा प्रादुर्भाव यामुळेही रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. रोगाची लक्षणे: पानांवर तपकिरी रंगाचे ठिपके दिसतात जे एकमेकांभोवती पडलेल्या वर्तुळाप्रमाणे दिसतात. हळूहळू ठिपके वाढून पान पूर्णपणे वाळून जाते. फ्लॉवरच्या गड्ड्यांवर काळसर रंगाचे ठिपके दिसून येतात आणि हळूहळू संपूर्ण गड्डा काळसर होतो.नुकसान: या रोगामुळे साधारणतः १० ते ४० टक्क्यांपर्यंत पिकाचे नुकसान होऊ शकते. अन्य यजमान पिके: कोबी, चायना कोबी, ब्रोकोली, बृशेल, मोहरी. नियंत्रणाचे उपाय: प्रतिबंधात्मक उपाय: प्रमाणित बियाण्यांचा वापर. बियाण्यांना बुरशीनाशकांची बीजप्रक्रिया. पीक फेरपालट. योग्य जलव्यवस्थापन. संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन. किडींचा नियंत्रण. रोगग्रस्त पाने आणि गड्डे त्वरित नष्ट करणे. रोगप्रतिकारक उपाय: शिफारस केलेल्या बुरशीनाशकांचा वापर. जैविक बुरशीनाशक जसे की ट्रायकोडर्मा व्हिरीडीचा वापर. टीप: शिफारस केलेल्या बुरशीनाशकांचा वापर तज्ञांच्या सल्ल्यानेच करावा. रोगाचा प्रादुर्भाव दिसल्यास ताबडतोब कृषी तज्ञांचा सल्ला घ्या.अतिरिक्त माहिती: अधिक माहितीसाठी आपण आपल्या वळच्या कृषी विद्यापीठ किंवा कृषी विज्ञान केंद्राचा संपर्क साधू शकता.




### महत्वाच्या घटना

१४९० : मलिक अहमद या जुन्नर येथील बहामनी सेनापतीने उर्वरित बहामनी सैन्याचा पराभव करून जुन्नर येथे स्वतंत्र सल्तनतीची घोषणा केली.
१५०३ : पोप अलेक्झांडर सहाव्याच्या फतव्यानुसार स्कॉटलँडचा राजा जेम्स चौथा व मार्गारिट ट्युडोरचे लग्न झाले.
१५८८ : एकशे तीस युद्धनौकांवर ३०,००० सैनिकांसह स्पॅनिश आर्माडा इंग्लंडवर चाल करायला निघाला.
१७७४ : अमेरिकन क्रांती पहिल्या कॉन्टिनेन्टल काँग्रेसला सुरुवात.
१८३० : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष अँड्र्यू जॅक्सनने इंडियन रिमुव्हल ऍक्टवर सही करून स्थानिक अमेरिकन जमातींना स्थलांतर करण्यास भाग पाडले.
१८९२ : जॉन मुइरने सान फ्रांसिस्कोमध्ये सियेरा क्लबची स्थापना केली.
१९०५ : रशिया-जपान युद्ध-त्सुशिमाची लढाई जपानी दर्यासारंग टोगो हेहाचिरोने रशियाचे आरमार बुडवले व लढाई संपवली.
१९०७ : पहिली आइल ऑफ मॅन टीटी रेस आयोजित करण्यात आली.
१९१८ : अझरबैजानने स्वतःला स्वतंत्र घोषित केले.
१९३६ : ऍलन ट्युरिंगने ऑन कम्युटेबल नंबर्स हा शोधनिबंध प्रकाशित केला.
१९३७ : फ्रँकलिन डिलानो रूझवेल्टने वॉशिंग्टन डी.सी.मध्ये बटन दाबून सान फ्रांसिस्कोमधील गोल्डन गेट ब्रिज वाहतूकीला खुला केला.
१९३७ : नेव्हिल चेंबरलेन युनायटेड किंग्डमच्या पंतप्रधानपदी.
१९४० : दुसरे महायुद्ध बेल्जियमने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९५२ : ग्रीसमधे स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला.
१९५८ : ७५ व्या वाढदिवसानिमित्त स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा मुंबई महापालिकेतर्फे सत्कार करण्यात आला.
१९५९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने दोन अमेरिकन माकडांना अंतराळ यात्रा घडवून आणली.
१९६४ : पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन () ची स्थापना झाली.
१९७० : ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस पक्षाचे औपचारिकपणे विभाजन करण्यात आले.
१९९६ : भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा राजीनामा
१९९८ : भारताने केलेल्या अणुचाचणीला उत्तर म्हणून पाकिस्तानने पाच अणुबॉम्ब उडवले.
१९९९ : इटली मध्ये लिओनार्डो दा विंची यांचे द लास्ट सपर हे चित्र प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले.
२००४ : अयाद अल्लावी इराकच्या पंतप्रधानपदी.
२००८ : साली नेपाल मध्ये पुरातन काळापासून चालत आलेली राजशाही परंपरेचा अंत करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५२४ : सलीम दुसरा, ऑट्टोमन सम्राट.
१६६० : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पहिला) यांचा जन्म. (मृत्यू: ११ जून १७२७)
१७३८ : जोसेफ-इग्नास गिलोटिन, फ्रांसचा डॉक्टर.
१७५९ : छोटा विल्यम पिट, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
१८८३ : क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १९६६)
१९०३ : उद्योगपती, किर्लोस्कर उद्योगसमूहाचे आधारस्तंभ शंतनुराव किर्लोस्कर यांचा जन्म. (मृत्यू: २४ एप्रिल १९९४)
१९०७ : स्वातंत्र्यसेनानी रायगड मिलिटरी स्कूलचे संस्थापक दिगंबर विनायक तथा नानासाहेब पुरोहित यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर १९९४)
१९०८ : दुसर्या महायुध्दातील गुप्तहेर, लेखक, पत्रकार आणि जेम्स बाँड चा जनक इयान फ्लेमिंग यांचा जन्म. (मृत्यू: १२ ऑगस्ट १९६४)
१९२१ : शास्त्रीय गायक पं. दत्तात्रय विष्णू ऊर्फ बापूराव पलुसकर यांचा जन्म. (मृत्यू: २५ ऑक्टोबर १९५५)
१९२३ : तेलगू अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते व आंध्रप्रदेशचे १० वे मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९९६)
१९२५ : ब्युलेंट एसेव्हिट, तुर्कस्तानचा पंतप्रधान.
१९४६ : भारतीय कवी आणि समीक्षक के. सच्चिदानंदन यांचा जन्म.
१९४८ : प्रख्यात भारतीय मल्याळम आणि इंग्रजी भाषिक कवी आणि समीक्षक तसचं, मल्याळ भाषेतील आधुनिक काव्याचे प्रणेते, द्वैभाषिक साहित्य समीक्षक, नाटककार, संपादक, स्तंभलेखक आणि अनुवादक, भारतीय साहित्य जर्नलचे माजी संपादक आणि साहित्य अकादमीचे माजी सचिव के. सच्चिदानंदन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७८७ : ऑस्ट्रियन संगीतकार व व्हायोलिनवादक लिओपोल्ड मोत्झार्ट यांचे निधन. (जन्म: १४ नोव्हेंबर १७१९)
१९६१ : प. कृ. गोडे, प्राच्यविद्या संशोधक.
१९७९ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय चिकित्सक (डॉक्टर), शिक्षणतज्ज्ञ, बँकर आणि समाजसेवक डॉ. टोन्से माधव अनंत पाई यांचे निधन.
१९८२ : बळवंत दामोदर ऊर्फ कित्तेवाले निजामपूरकर यांचे निधन.
१९९४ : हिंदूसभेचे नेते व पुण्याचे महापौर गणपतराव नलावडे यांचे निधन.
१९९९ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते बी. विट्टलाचारी यांचे निधन. (जन्म: १८ जानेवारी १९२०)

## थोडक्यात

### संपादक गावरस्कर यांचा गौरव कार्यक्रम रद्द

बीड। प्रतिनिधी

येथील ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम आण्णा गावरस्कर यांना अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा नागोराव दुधगावकर पत्रकारिता पुरस्कार जाहीर झालेला आहे. त्याबद्दल बीड येथील पत्रकार मित्र मंडळींच्या वतीने गौरव सोहळा बुधवार २८ मे रोजी १२.३० वाजता पत्रकार भावन येथे आयोजित केला होता. परंतु भाजपाचे माजी आमदार आर टी देशमुख यांचे आकस्मिक निधन झाल्याने आणि आज त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार असल्याने हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे कार्यक्रमाची सविस्तर तारीख कळविण्यात येईल अशी माहिती संयोजक प्रमोद कुलकर्णी यांनी दिली.



यापूर्वीचा हा पुरस्कार बीड येथील ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख आप्पा यांना देण्यात आला होता, यावेळी जेष्ठ पत्रकार मधुकर भावे आणि मान्यवरांच्या उपस्थितीत अलिबाग येथील सोहळ्यात बीडचा मोठा सहभाग राहिला होता. यावर्षी मधुकर भावे यांच्या जीवनगौरव पुरस्कार सन्मानासोबतच बीड येथील संपादक गावरस्कर आण्णा यांना नागोराव दुधगावकर पुरस्कार घोषित झाला असून मुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या उपस्थितीत लवकरच मुख्य गौरव सोहळा मुंबईत संपन्न होणार आहे. यानिमित्ताने आज बीड येथील पत्रकार मित्र मंडळी च्या वतीने आण्णांचा सन्मान ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी सोलापूर आणि अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या उपस्थितीत बुधवारी होणार होता. मात्र भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार आर. टी. देशमुख यांच्या आकस्मित निधनाने आणि आज त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार असल्याने हा सत्कार सोहळा पुढे ढकलण्यात आल्याची माहिती कार्यक्रमाचे संयोजक प्रमोद कुलकर्णी, अतुल कुलकर्णी यांनी दिली. या कार्यक्रमाची पुढील तारीख सविस्तर कळवण्यात येईल असे त्यांनी म्हटले आहे.

### अनिल जाधवर यांचा सेवापूर्ती सोहळा

बीड। प्रतिनिधी

प्राथमिक पदवीधर शिक्षक अनिल संपत्ती जाधवर हे दि. ३१ मे रोजी सेवानिवृत्त होत असून त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन दि. २९ मे रोजी करण्यात आले आहे. तरी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले.शिक्षक अनिल जाधवर यांचा सेवापूर्ती सोहळा हॉटेल नीलकमल येथे सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आला असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिक्षण अधिकारी भगवान फुलारी तर प्रमुख अतिथी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारीआदित्य जीवने, प्रकल्प अधिकारी संगीता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे, अप्पर निबंधक राजेश जाधवर, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, लेखा वित्त अधिकारी सुरेश केंद्रे, काँग्रेसचे दादा मुंडे, प्राचार्य डॉ. विक्रम सारूक, प्राचार्य खुशालराव मुंडे, प्रा.भाऊसाहेब सानप, उपलेखा वित्त अधिकारी संजय नागरगोजे, उपशिक्षणाधिकारी मैनाताई बोराडे, उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, शा.पो अधीक्षक रंगनाथ राऊत, गटशिक्षणाधिकारी समंदर खान सह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी शिक्षण प्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले.

### बाप- लेकाचा करंट लागून जागीच मृत्यू

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील मारफळा येथील शेतकरी अभिमान लक्ष्मण कबले हे आपल्या गावा जवळ शेतातील मोटर चालू करण्यासाठी नेहमी प्रमाणे गेले होते मोटर मध्ये करंट उतरल्याने अभिमान लक्ष्मण कबले,वय वर्षे ५० हे चिकटले होते त्यांना वाचवण्यासाठी त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर अभिमान कबले वय वर्षे २२ हे बापाला वाचवण्यासाठी गेला होता परंतू ते पण चिटकवून दोन्ही बाप लेकाचा करंट लागल्याने जागीच मृत्यू झाल्याची दुदैवी घटना दिं.२७ /५/२०२५ रोजी सकाळी सात वाजता मंगळवारी घटना घडली आहे. दोन्ही बाप लेकाचा शवविच्छेदन बीड जिल्हा रुग्णालयात करण्यात आला आहे. या घटनेने मारफळा गावात हळ हळ व्यक्त होत आहे.बीड येथे अकास्मत मृत्याची नोंद करण्यात आली आहे.

### ऑलिंपियाड परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी

बीड । प्रतिनिधी

जगातील सर्वात मोठे ऑलिंपियाड असलेल्या सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनने घेतलेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाड परीक्षेत बीडच्या तीन विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय क्रमांक मिळवला. प्रमोद जी. महाजन न्यू इंग्लिश स्कूलच्या होलाम्बे अद्वैत सूरजने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आणि आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र जिंकले. प्रमोद जी महाजन न्यू इंग्लिश स्कूलच्या गुजर अवधूत लिंब्रतनेही आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये दुसरा क्रमांक मिळवला आणि आंतरराष्ट्रीय रौप्य पदक आणि प्रमाणपत्र मिळवले. परळी येथील माध्यमिक विद्यालयाच्या भेल आरुष चंद्रकांत कोहलीनेही आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिंपियाडमध्ये तिसरा क्रमांक मिळवला आणि प्रमाणपत्रासह आंतरराष्ट्रीय कांस्य पदक मिळवले.

# अहिल्यादेवी होळकर त्रिजन्म शताब्दी कीर्तन महोत्सवानिमित्त कीर्तन

## मुलीसाठी माहेरचा दरवाजा कायम उघडा ठेवा- शामसुंदर महाराज सोन्नर

सिरसाळा। प्रतिनिधी

स्त्रियांना योग्य संधी व स्वातंत्र्य मिळाले की त्या आपले कर्तृत्व सिद्ध करतात. म्हणून मुलींच्या लग्नाची घाई न करता त्यांना ज्या क्षेत्रात शिक्षण, करियर करायचे असेल ते करू द्या. त्या नक्कीच यश मिळवतील, असा विश्वास शामसुंदर महाराज सोन्नर यांनी व्यक्त केला. मुलगी हे परक्याचं धन आहे. ही भावना डोक्यातून काढून टाका आणि तिच्यासाठी माहेरचा दरवाजा कायम उघडा ठेवा, असे आवाहन त्यांनी सिरसाळा येथे केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्म शताब्दीनिमित्त सिरसाळा येथे शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या मार्गदर्शनाखाली कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याची सांगता शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या काल्याच्या




कीर्तनाने झाली. त्या प्रसंगी ते बोलत होते. शामसुंदर महाराज सोन्नर पुढे म्हणाले की, अहिल्यादेवी होळकर यांनी सर्व जाती-धर्मातील लोकांसाठी काम केले. एक आदर्श राज्य कसे चालवावे याचा वस्तुपाठ त्यांनी घालून दिला, परंतु त्यांच्या जयंतीला डीजे लावून, दारू पिऊन धांगडधिंगा केला जातो, हे दुर्दैव आहे. डीजेमुक्त जयंतीचा संकल्प करा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रिंगण आणि दुचाकी रॅली अहिल्यादेवी होळकर त्रिजन्म शताब्दीनिमित्त आयोजित केलेल्या कीर्तन महोत्सवाच्या समारोपानिमित्त सिरसाळा येथे दुचाकी रॅली आणि दिंडीचे आयोजन केले होते. दिंडी दरम्यान केलेल्या गोल रिंगणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रिंगणात तरुण कार्यकर्त्यांनी ताल धरला होता. हा आनंद डीजेपेक्षा किती तरी जास्त असल्याच्या भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या. दुचाकी रॅलीतही मोठ्या संख्येने तरुण सहभागी झाले होते.

## जालन्यात मोती तलावात २ सख्या भावांचा बुडून मृत्यू

जालना। प्रतिनिधी

मोती तलावात पोहण्यासाठी गेलेल्या दोन सख्या भावांचा बुडून मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना सोमवार दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली. या दुर्घटनेने संपूर्ण शहरात शोककळा पसरली असून सय्यद कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मृत्यूमुखी पडलेले दोघे भाऊ जुनेद असेफ सय्यद (वय १८) आणि आयान आसिफ सय्यद (वय १५) हे शेर सवार नगर, जुना जालना येथील रहिवासी होते. हे दोघे भावंडे आपल्या मामासह आणि इतर नातेवाईकांसोबत मोती तलाव परिसरात फिरण्यासाठी आले होते. पोहण्याचा मोह आवरता न आल्याने दोघेही आईच्या समोरच तलावात उतरले, मात्र काही क्षणातच दोघांचाही बुडून मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच चंदनझीरा पोलीस ठाण्याचे कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान व स्थानिक नागरिक घटनास्थळी दाखल झाले आणि शोधमोहीम सुरू केली. तब्बल अडीच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर दोघांचेही मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात यश आले.मिळालेल्या माहितीनुसार या दोघांच्या घरी अवघ्या चार दिवसांनी त्यांच्या बहिणीचे लग्न होणार होते. घरात चाललेली लगबग क्षणात थांबली आणि आनंदमय वातावरणात दुःखाचे काळे ढग दाटून आले. मृत्यूच्या बातमीने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मोती तलाव परिसरात हजारो नागरिकांची गर्दी जमली होती. चंदनझीरा पोलीस ठाण्याच्या अधिकार्यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय सामान्य रुग्णालयात पाठवले आहेत. पुढील तपास चंदनझीरा पोलीस करीत आहेत. हा अपघात केवळ दुःखदच नाही, तर सतर्कतेचा इशाराही देणारा आहे. अशा जलाशयांमध्ये सुरक्षा उपाययोजनांची गरज अधोरेखित करणारी ही घटना आहे.

## मोटारसायकल चोरी करणाऱ्या आरोपीला पकडलं

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्हयात मोटार सायकल चोरी करणा-या इसमाची माहिती घेऊन कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या.

डावरगाव ते झिरपी फाटयादरम्यान अनोळखी इसमाने फिर्यादी विश्वनाथ एकनाथ मिरकड यांची होंडा शाईन मोटार सायकल चोरी केली असल्याने सदर गुन्हयातील अनोळखी आरोपीताचा शोध घेत असतांना तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी विकास ऊर्फ मिड्डु संजय बहिरे, वय-२९ वर्ष, रा. कन्हेरवाडी, ता. परळी, जि.बीड याने सदरचा गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी नामे विकास ऊर्फ मिड्डु संजय बहिरे, वय-२९ वर्ष, रा. कन्हेरवाडी, ता.परळी, जि.बीड यास बीड येथुन ताब्यात घेवुन त्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली देवुन गुन्हयातील चोरी केलेली होंडा शाईन कंपनीची एक मोटार सायकल काढुन दिल्याने ती जप्त करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि, योगेश उबाळे, राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सुधीर वाघमारे, दिपक घुगे, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, देविदास भोजने, ईरशाद पटेल, सतिष श्रीवास, आक्रूर धांडगे, भागवत खरात, धीरज भोसले, कैलास चेके, सौरभ मुळे सर्व स्था.गु.शा. जालना यांनी केली आहे.

## अपघातात मृत्यू झालेल्या मित्रांना भावपूर्ण श्रद्धांजली..!

### गेवराईजवळ आयशर टेम्पोची भीषण धडक, सहा जणांचा मृत्यू, दोघे गंभीर जखमी

गेवराई प्रतिनिधी

सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील गढी उड्डाणपुलाजवळ एक भीषण अपघात घडला. बीडहून गेवराईकडे जाणाऱ्या आयशर टेम्पो (क्रमांक -०४ -२३४८) ने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवत रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या नागरिकांना जोरदार धडक दिली.



या अपघातात स्वप्नील भिमराव कोकाटे (वय ३५, रा. माऊली नगर, गेवराई) आणि साक्षीदार हेमंत दाभाडे, योगेश शिंदे हे गंभीर जखमी झाले आहेत. तसेच या अपघातात सहा नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.१. भागवत गंगाधर परळकर (वय ३९, रा. संभाजी चौक, गेवराई), २. मनोज वैजिनाथ करांडे (वय ३८, रा. रांजणी, ता. गेवराई), ३. सचिन रमेश ननवरे (वय ३४, रा. संजयनगर, गेवराई), ४. बाळासाहेब ऊर्फ बाळु ज्ञानोबा आतकरे (वय ३५, रा. सावतानगर, गेवराई), ५. दीपक राजपाल सरोया (वय ४२, रा. गढी), ६. कृष्णा गंगाराम जाधव (वय ३५, रा. संजयनगर, गेवराई) अपघातानंतर आयशर टेम्पोचा चालक घटनास्थळावरून फरार झाला असून त्याचा शोध सुरू आहे. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३४०/२०२५ अंतर्गत भारतीय दंड विधानातील कलम १०६(१), १२५(अ), १२५(ब), २८१ तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १३४/१७७ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मिना यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी ने बामु विद्यापीठाला केले सुधारित यादी प्रसिद्ध करण्याचे आवाहन

माजलगाव/प्रतिनिधी

गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव हे महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२१-२२ म्हणजे मागील ४ वर्षा पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे (डीबाटू) या विद्यापीठाशी संलग्नित करण्यात आलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर (बामू) यांनी १७/०५/२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रथम वर्ष प्रवेश निलंबन यादीत गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव

**बामू विद्यापीठाची संलग्नता नसतानाही आले होते होते यादीत नाव**

या महाविद्यालयाचे नाव समाविष्ट केले होते.परंतु गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे विद्यापीठाशी संलग्नित असल्यामुळे बामू विद्यापीठाची चूक लक्षात आणून देऊन सुधारित यादी प्रसिद्ध करण्याचे आवाहन महाविद्यालय प्रशासनाने केलेले आहे.

## सावंतवाडी उमरी येथील महालक्ष्मी लोकनाटय कला केंद्राचा परवाना रद्द

बीड। प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक बीड यांनी दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी महालक्ष्मी कला केंद्र सावंतवाडी (उमरी) तालुका केजबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास अहवाल सादर केला असून सदरील अहवालामध्ये त्यांनी महालक्ष्मी कला केंद्र सावंतवाडी (उमरी) तालुका केज या ठिकाणी बाहेरील जिल्ह्यातून महिला आणून आरोपी हे वेश्या व्यवसाय करून घेत असे तपासात निष्पन्न झालेले आहे.

तसेच यापूर्वी सदरील लोकनाट्य कला केंद्र चालक यांच्यावर दिनांक ७.७. २०२३ रोजी पोलीस ठाणे केज येथे गुरनं १८८, १०९, ११४, २९०,३४,३७० (४) (५), ३७० (अ) ३७३, ३७६ (फ) (आय) भादवी सह कलम च४,६, १७, १८, २१ बालकांचे लैंगिक अत्याचार अधिनियम सह कलम ३,४,५,६,८,९२०१५ सह कलम ३ (२) () अजाज अप्रका सह कलम ६५ (ई) मु.आ.का. प्रमाणे गुन्हा दाखल असून सदरठिकाणी पुन्हा अशा स्वरुपाचा गुन्हा घडू नये पिडीत महिलांचे शोषण होऊ नये म्हणून त्यावर कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर गुन्याचे घटनास्थळ महालक्ष्मी कला केंद्र, सर्वे नंबर १६०, सावंतवाडी (उमरी) ता. केज यांच्यावर कायदेशीर कार्यवाही होऊन सदरचे कला केंद्र सिल होण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी बीड यांनी सदरील प्रकरणास सुनावणी घेऊन सुनावणी अंति सदरील महालक्ष्मी कला केंद्र सावंतवाडी (उमरी) तालुका केज यांना देण्यात आलेल्या लोकनाट्य कला केंद्राचा परवाना रद्द करण्याचे आदेश पारित केलेले आहे असे जिल्हाधिकारी बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या शासन निर्णयानुसार बदल्या करा-अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

महसूल प्रशासनातील तलाठी व मंडळ अधिकारी हे स्थानिक पातळीवर प्रशासनाचा कणा मानले जातात. मात्र, बीड जिल्ह्यातील अनेक तलाठी व मंडळ अधिकारी १० ते १५ वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्यामुळे प्रशासनात पारदर्शकतेचा अभाव दिसून येत आहे. त्यामुळे महसूल कामकाजात गैरव्यवहार, भ्रष्टाचार वाढल्याची तक्रारी सातत्याने समोर येत आहेत.

शासनाने तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या बदल्यांसाठी ३ ते ५ वर्षांचा कालावधी निश्चित केला असून, यानुसार बदल्या करणे आवश्यक असतानाही बीड जिल्ह्यातील अनेक अधिकारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत आहेत. उपविभागीय कार्यालयातील आस्थापना विभागातून या बदल्या केल्या जात होत्या, त्यामध्ये आर्थिक व्यवहार व राजकीय हस्तक्षेपाचा आरोप वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केला आहे.

शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून शासकीय कार्यालये व निवासस्थाने उभारली असतानाही अनेक तलाठी व मंडळ अधिकारी शहरातील खासगी इमारतींमध्ये कार्यालये थाटून काम करत आहेत. यामुळे सार्वजनिक पैशांची नासाडी होत असून, सामान्य जनतेस कार्यालयीन कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. तरी, बीडचे मा. जिल्हाधिकारी यांनी याची गंभीर दखल घेऊन शासन निर्णयाच्या अधीन राहून वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी किंवा एकाच तालुक्यात कार्यरत असलेल्या तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या तात्काळ बदल्या कराव्यात, शासकीय कार्यालये व निवासस्थाने वापरणे बंधनकारक करावे, तसेच आस्थापना विभागातील गेल्या १५ वर्षांतील बदल्यांची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे.

# ३१ मे रोजी जन्मणाऱ्या मुलींच्या नावे पाच हजार रुपयांचे फिक्स डिपॉझिट करणार

## माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त स्तुत्य उपक्रम

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दि. ३१ मे रोजी उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे जन्म घेणार्या मुलींच्या भवितव्यासाठी पाच हजार रुपयांचे फिक्सडिपॉझिट करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी सोशल मिडीयाचे तालुकाध्यक्ष संदिप मडके आणि र.भ.अट्टल महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दत्ताभाऊ पिसाळ यांनी अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या दोन वर्षांपासून या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन केले आहे. दि. ३१ मे रोजी जन्मलेल्या मुलींच्या आईच्या नावाने प्रत्येकी पाच हजार रुपयांचे फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने गेवराई तालुक्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी सोशल मिडीयाचे तालुकाध्यक्ष संदिप मडके आणि र.भ. अट्टल महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दत्ताभाऊ पिसाळ यांच्या वतीने बुधवार दि. ३१ मे रोजी उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे जन्मलेल्या मुलींच्या आईच्या नावे पाच हजार रुपये शिवशारदा मल्टीस्टेट, गेवराई येथे फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहे. शुक्रवार दि. ३० मे रात्रौ १२ वाजल्या पासुन ते शनिवार दि. ३१ मे रात्रौ १२ वाजेपर्यंत या कालावधीत जन्मलेल्या मुलींच्या आईच्या नावाने पाच हजार रुपयांची मुदत ठेव विस वर्षाच्या मुदती करता ठेवण्यात येणार आहे. गेल्या दोन वर्षांपासून त्यांनी हा उपक्रम राबविला असून हे तिसरे वर्ष आहे. उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक यांना तसे लेखी कळविण्यात आले असुन उपजिल्हा रुग्णालयातील प्रमाणपत्राच्या आधारे फिक्त डिपॉझिटची पावती संबंधितांना दिली जाणार आहे. स्त्रीभृण हत्या आणि कमी झालेला मुलींचा जन्मदर या बाबी लक्षात घेता या उपक्रमाला महत्व प्राप्त झाले आहे. नेत्याचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातुन साजरा करत त्यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देण्यात असल्याची माहिती संदिप मडके आणि दत्ता पिसाळ यांनी दिली.

## नॅकच्या गुणवत्ता मूल्यांकनासाठी देवगिरी प्रतिष्ठानची दोन महाविद्यालये सज्ज

बीड। प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन आणि तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालय ही दोन्ही महाविद्यालये राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद (नॅक) यांच्या गुणवत्ता मूल्यांकन प्रक्रियेस सामोरे जात आहेत. नॅकच्या दिशानिर्देशांनुसार सर्व दस्तऐवजीकरण आणि प्रस्तुतीकरणाची तयारी महाविद्यालयांनी पूर्ण केली आहे. तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनचे नॅक मूल्यांकन बुधवार, २९ मे रोजी ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, पायाभूत सुविधा आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रम यासाठी मागील काही महिन्यांपासून नियोजनबद्ध तयारी केली आहे. या मूल्यांकनासाठी सर्व आवश्यक बाबींची पूर्तता करण्यात आली आहे.

दरम्यान, तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालयाचे

**२९ मे रोजी तुलसी फॅशन कॉलेजची नॅक परीक्षा, तर आयटी कॉलेजची प्रक्रिया यशस्वी पूर्ण**

मूल्यांकन नॅकच्या नॅक टीमने सोमवार, २६ मे रोजी दोन दिवसांच्या कालावधीत पूर्ण केले. या दरम्यान शैक्षणिक प्रक्रिया, प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकास योजना तसेच संस्थेच्या सामाजिक जबाबदारीचे सविस्तर मूल्यमापन करण्यात आले असून ही प्रक्रिया महाविद्यालयाने यशस्वीरित्या पार पडली आहे. नॅकच्या अंतिम अहवालानंतर दोन्ही कॉलेजेसना त्यांचे ग्रेडिंग जाहीर केले जाणार आहे. हे ग्रेडिंग मिळाल्यानंतर देवगिरी प्रतिष्ठानच्या शैक्षणिक उत्कृष्टतेला निश्चितच अधिक चालना मिळणार आहे.

# पात्र शेतकऱ्यांना शंभर टक्के पीक कर्ज वाटप करा; बियाणांचा काळा बाजार आणि बोगसगिरी रोखा

## डॉ. ज्योती मेटे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

हवामान खात्याच्या अंदाजानुसार मान्सून महाराष्ट्रामध्ये दाखल झाला असून यावर्षी पर्जन्यमान सरासरी पेक्षा जास्त आहे ही बाब अतिशय समाधानकारक आहे. पात्र शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ मध्ये शंभर टक्के पीक कर्ज वाटप होणे आवश्यक आहे. जानेवारी ते एप्रिल २०२५ अखेर महाराष्ट्रात झालेल्या शेतकरी आत्महत्येचा विचार करता महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात झालेल्या आहेत ही बाब क्लेशकारक आहे. कर्जबाजारीपणा, शेतमालाला हमीभाव नसणे, हवामानाचा फटका या बाबी शेतकरी आत्महत्यास कारणीभूत ठरतात हे विचारात घेता जिल्ह्यातील पतआराखड्यानुसार खरीप हंगाम २०२५ करिता रुपये १५६६ कोटी इष्टांक पूर्तते करिता डी.एल.सी.सी मध्ये नियमित आढावा घेऊन इष्टांक पूर्तते बाबत जिल्हा अग्रणी बँकेस सूचित करण्यात यावे आणि पत्र शेतकऱ्यांना शंभर टक्के पीक कर्ज वाटप करून बियाणांचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा या संदर्भात शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली.

बीड जिल्ह्यामध्ये खरीप हंगाम २०२४ चे इष्टांक रु १७०७ कोटी पैकी ११७३ कोटी पूर्तता ६९% आहे. पैकी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची पूर्तता ६१% आहे. या बँकेची आर्थिक स्थिती विचारात घेता राष्ट्रीयकृत बँकेकडून अपेक्षित पूर्तता झालेली नाही, ही बाब विचारात घेता चालू खरीप हंगामामध्ये एकूण इष्टांक रुपये १५६६ कोटी पैकी राष्ट्रीयकृत व इतर बँकांकडून इष्टांक पूर्तता अनिवार्य करण्यात यावी. कृषी, महसूल व सहकार विभागाचे समन्वयातून पात्र खातेधारकांना १०९% सभासद करून घेणे व नवीन सभासदांना कर्ज वाटप करण्याची विशेष मोहीम हाती घेणे आवश्यक आहे.

चालू हंगामात शेतकऱ्यांना खते बी बियाणे यांचा मुबलक पुरवठा वेळेत होईल तसेच त्यांचे लिंकिंग होणार नाही याकरिता यंत्रणेने दक्ष राहणे तसेच बोगस बियाणे व चढ्या दराने विक्रीस प्रतिबंध करण्यात यावा व त्याविरुद्ध दाद मागण्याची यंत्रणा शेतकऱ्यांकरिता प्रसिद्ध करण्यात यावी. असे दिलेल्या निवेदन

डॉ. ज्योती मेटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली जेणेकरून शेतकऱ्यांची खरीप हंगाम २०२५ मध्ये फसवणूक होणार नाही.

या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, तालुकाध्यक्ष पंडित माने, मनोज जाधव, जितांजली डोरले,संगीता ठोसर, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले आदी उपस्थित होते.



### सर्व कृषी सेवा केंद्र बाहेर शेतकऱ्यांसाठी हेल्पलाइन नंबर देणार –विवेक जॉन्सन

या मागण्यांना मा.जिल्हाधिकारी महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत उपरोक्त विषयांवर जिल्हा प्रशासन तत्परपणे काम करेल असे आश्वासन दिले. त्याचबरोबर बोगस बियाणे आणि बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांना समस्या निर्माण होऊ नये याकरिता प्रशासनाच्या वतीने टोल फ्री क्रमांक आणि थेट जिल्हाधिकाऱ्यांना समस्या पोहोचतील याकरिता एक मोबाईल नंबर सर्व कृषी सेवा केंद्रांच्या बाहेर जाहीर रित्या लावण्यात येईल,डी.एल.सी.सी सभेमध्ये कर्ज वाटपाचा नियमित घेण्यात येईल असे त्यांनी यावेळी नमूद केले.

## भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी भारत जिंदाबाद रॅलीत कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे –किसन तांगडे

बीड प्रतिनिधी

जम्मू-काश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकावर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठावीस भारतीयांची हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिन्दूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैनिकांनी अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी सिन्दूर ऑपरेशन यशस्वी केल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सैनिकांच्या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलीदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने बीड शहरात शुक्रवार दि. ३० मे २०२५ रोजी सकाळी ठिक ११ वाजता युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली भारत जिंदाबाद रॅली आयोजित करण्यात आली आहे. ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सुरुवात होऊन साहित्यरत आण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार आहे.



भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरात रिपाईच्यावतीने दिनांक ३० मे २०२५ शुक्रवार रोजी काढण्यात येणाऱ्या भारत जिंदाबाद रॅलीत बीड तालुक्यातील रिपाई कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन रिपाइंचे बीड तालुकाध्यक्ष किसन तांगडे, बापू पवार, सुभाष तांगडे, भाऊसाहेब कांबळे, सतीश सिनगारे, भीमराव घोडेराव, राजाभाऊ वक्ते,राजाभाऊ कांबळे, देवानंद वाघमारे, भास्कर जावळे, भाऊसाहेब दळवी, भैय्या वाघमारे, रतन वाघमारे, रामेश्वर खळगे, नामदेव वाघमारे, नवनाथ डोळस, कैलास जोगदंड, विजय ओव्हाळ, प्रणव पायाळ,विशाल इंगोले, अजित सावंत, बंडू ठोंबरे, विशाल गव्हाणे, सिद्धार्थ वाघमारे, आकाश जावळे, विशाल पवार, राजेंद्र भालेराव, बबलू सोनवणे, मोहन खेमाडे, महादेव इनकर,विक्रम सोनवणे,तेजराज केंगार, दयानंद उबाळे, बाजीराव वाघमारे,अजय आठवले, अशोक दळवी, श्रीमंत जाधव, विकास वाघमारे, अमोल डावकर, लखन ठोकळ, संदेश मस्के आदींनी केले आहे.

### उज्ज्योत प्रिमियर लीग – २०२५ चे अंबाजोगाईत आयोजन

## नवकेशर सुपर किंगची विजयी सलामी; सचिन उपाडे ठरले मॅन ऑफ द मॅच

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील उज्ज्योत फाऊंडेशन आणि योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उज्ज्योत प्रिमियर लीग – २०२५ चे अंबाजोगाईत आयोजन करण्यात आले आहे. सुरूवातीच्या सामन्यात नवकेशर सुपर किंगने विजयी सलामी देत २ षटके राखून १३ षटकांत (ओव्हर) मध्ये ८७ धावा काढून सामना जिंकला. तर आर.आर.पॉलिटेक्निक संघाने ८३ धावा काढल्या. या सामन्यात नवकेशर सुपर किंगचे गोलंदाज सचिन उपाडे हे ३ षटकांत (ओव्हर) मध्ये ११ धावा देत आणि २ विकेट घेत मॅन ऑफ द मॅच ठरले. उज्ज्योत प्रिमियर लीगला क्रिकेट प्रेमींचा भरभरून प्रतिसाद लाभत आहे.




अंबाजोगाई शहरातील श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या भव्य राजमाता जिजाऊ मैदानावर उज्ज्योत फाऊंडेशन आणि योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उज्ज्योत प्रिमियर लीग – २०२५ चे अंबाजोगाईत आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा रविवार, दिनांक २५ मे २०२५ पासून सुरू झाल्या आहेत. उज्ज्योत प्रिमियर लीग – २०२५ मध्ये नवकेशर सुपर किंग, अजिंक्य सिसी, आर.आर.पॉलिटेक्निक, द लिगल ईगल, आयडियल क्रिकेट क्लब आणि विराट वायपर्स या सहा संघांनी सहभाग घेतला आहे. हे सामने सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत या वेळेत लेदर बॉलवर खेळवले जात आहेत. या सामन्यांचे पंच (अंपायर) म्हणून संघर्ष इंगळे आणि अशोक खाडे यांनी काम ◀◀ पान ३ वर

## शिवप्रकाश स्वामी यांचे निधन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज तालुक्यातील बोरीसावरगाव येथील लोकमत चे एजंट व वार्ताहर शिवप्रकाश लिंगमुर्ती स्वामी (वय- ६८) यांचे मंगळवारी पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मंगळवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

## श्री क्षेत्र चाकरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह, प्रदीप मिश्राजी यांची शिवमहापुराण कथा

### माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास उपस्थित रहावे – महादेव महाराज

**बीड । प्रतिनिधी**

**विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या पंचविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळ्याचे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन व प. पू. श्री प्रदीप मिश्राजी यांची शिवमहापुराण कथा होणार आहे. माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तपोनिधी, शांतीब्रह, गुरुवर्य महादेव महाराज (तात्या) श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या वतीने करण्यात येत आहे.**



भव्य अखंड हरिनाम सप्ताह मध्ये आंतरराष्ट्रीय शिवकथाकार प. पू. प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांची शिवमहापुराण कथा दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत दि. ०८ जून ते १४ जून दरम्यान होईल, सायंकाळी अभंगवाणी (संगीत भजन) महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक मंडळी सादरीकरण करणार आहे. रात्री अभंग संकीर्तन सेवा दि. ०७ जून शनिवार लक्ष्मण महाराज मेंगडे, (श्री क्षेत्र बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनुर), दि. ०८ जून रविवार प्रकाश महाराज बोधले, (संतपिठ श्री क्षेत्र पैठण तथा राष्ट्रीय अध्यक्ष अ. भा. वा. मंडळ), दि. ०९ जून सोमवार अमृताश्रम स्वामी महाराज (मंगलमूर्ती देवस्थान, राजुरी नवगण), दि. १० जून रोजी मंगळवार भागवताचार्य मुकुंद काका जाटदेवळेकर, दि. ११ जून बुधवार रोजी माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी पुण्यस्मरणार्थ गुलालाचे कीर्तन वारकरी संप्रदायभूषण रामायणाचार्य रामरावजी महाराज ढोक, नागापूरकर यांचे सकाळी १० ते १२ होणार आहे. रात्री रामायणाचार्य समाधानजी महाराज शर्मा यांचे रात्री ८ ते १० वेळेत होणार आहे. दि १२ जून गुरुवार रोजी व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गुरुजी, श्री क्षेत्र होळ, दि.१३ जून शुक्रवार रोजी महादेव महाराज राऊत, बीड, यांची कीर्तन सेवा होईल. दि. १४ जून शनिवार रोजी काल्याचे कीर्तन संदीपान महाराज हासेगावकर यांचे होणार आहे. कीर्तन सेवा झाल्यानंतर हरिजागर,भारुड, हरिपाठ, काकडा भजन, असे भव्य दिव्य कार्यक्रमांचे आयोजन श्री क्षेत्र चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास करण्यात आले आहे. जास्तीत जास्त भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री ह. भ. प. महादेव महाराज ( तात्या) चाकरवाडीकर यांनी केले आहे.

## सिने अभिनेते रितेश देशमुख व राजकिशोर मोदी यांच्या भेटीत विविध विषयांवर चर्चा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी मराठवाड्याचे सुपुत्र सुप्रसिद्ध सिने अभिनेते रितेश देशमुख तथा अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांची बाभळगाव येथील त्यांच्या निवासस्थानी झालेल्या कौटुंबिक भेटीत उभयतांमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. राजकिशोर मोदी हे लोकनेते स्व विलासराव देशमुख यांच्या ८० व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांची भेट विलासराव देशमुख यांचे सुपुत्र सिने अभिनेते रितेश देशमुख यांच्याशी भेट झाली. या भेटी दरम्यान त्यांच्यात राजकीय, सामाजिक तसच सांस्कृतिक विषयावर सांगोपांग चर्चा झाली.**



रितेश देशमुख यांच्या येऊ घातलेला छत्रपती शिवाजी या चित्रपटा विषयी माहिती देतांना रितेश देशमुख यांनी सांगितले की हा चित्रपट जवळपास सहा भाषांमध्ये येणार असून त्याचे स्वरूप हे भव्यदिव्य अशा स्वरूपात असणार आहे. महाराष्ट्राचे आराध्य छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाच्या मुख्य भूमिकेमध्ये रितेश देशमुख, संजय दत्त, अभिषेक बच्चन, जीनिलिया देशमुख, महेश मांजरेकर, सचिन खेडकर हे प्रमुख भूमिकेत असल्याचे रितेश देशमुख यांनी सांगितले. सदरील चित्रपट मराठी, हिंदी, तमिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळम या सहा भाषेत हा प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाबद्दल राजकिशोर मोदी यांनी रितेश देशमुख आणि त्यांच्या संपूर्ण टीमला (मुंबई फिल्म कंपनी) मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर स्व.विलासरावजी देशमुख यांचे अंबाजोगाई करांविषयीचे नाते याविषयी अतिशय दिलखुलास पणे चर्चा झाली. रितेश देशमुख यांनी देखील संपूर्ण अंबाजोगाई वासीयांचे आस्थेवाईकपणे चौकशी केली. त्यासोबतच त्यांनी अंबाजोगाईकरांची अतिशय जिव्हाळ्याची अशी अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक तथा बँकेच्या व्यवहाराबद्दल, तसेच मोदी लर्निंग सेंटरच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध शैक्षणिक संस्थाबद्दल देखील आपुलकीने चौकशी केली. यादरम्यान अभिनेते रितेश देशमुख यांना अंबाजोगाई शहरात येण्याचे निमंत्रण राजकिशोर मोदी यांनी दिले असतांना रितेश यांनी शूटिंग नसल्यास अथवा पूर्वनियोजित काही कार्यक्रम नसल्यास अंबाजोगाईला नक्की येईन अशी ग्वाही याप्रसंगी दिली.

## राजीव गांधी सद्भावना पुरस्काराने दत्ताभाऊ बारगजे सन्मानित

बीड । प्रतिनिधी

दिनांक २७ मे रोजी आनंदग्राम बीड येथे राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान वतीने आयोजित राज्यस्तरीय राजीव गांधी सद्भावना पुरस्कार श्री दत्ताभाऊ बारगजे यांना प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये प्रदान करण्यात आला.



याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे संत गाडगेबाबा अध्यायसणाचे प्रमुख श्री डॉ.दिलीप काळे, बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे, राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष प्रकाश साबळे, राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे सदस्य राहुल तायडे , अनुला खान, संध्याताई बारगजे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते. खरा तो एकची धर्म,जगाला प्रेम अर्पावे''या उक्तीनुसार बीड जिल्ह्यात मानवता व सामाजिक एकता अबाधित राहण्यासाठी दत्ताभाऊ बारगजे यांचे कार्य समाजासाठी दिशादर्शक असून समाजाने या कार्यातून प्रेरणा घ्यावी. असे मत राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे यांनी व्यक्त केले.

दत्ताभाऊ बारगजे यांना दिला जाणाऱ्या राजीव गांधी सद्भावना पुरस्कार मध्ये ◀◀ पान ३ वर

## महाराष्ट्र सरकार 'आदिशक्ती अभियान' राबवणार –ढाकणे

बीड । प्रतिनिधी

महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून, सन २०२५-२६ पासून राज्यात ''आदिशक्ती अभियान'' राबवण्यात येणार आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक समस्या सोडवून त्यांना खऱ्या अर्थाने सक्षम बनविणे या अभियानाअंतर्गत ग्रामस्तर ते राज्यस्तरापर्यंत विशेष समित्या स्थापन करून, प्रत्येक ग्रामपंचायतीने अनिवार्य सहभाग नोंदवायचा आहे. पुढील १५ दिवसांत ग्रामसभांच्या माध्यमातून या अभियानाची अंमलबजावणी सुरू होणार आहे. असे सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी सांगितले आहे.



राज्याची सुमारे ६०% लोकसंख्या महिला व बालकांचीच आहे. त्यांच्यापर्यंत शासनाच्या सर्व योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविणे, हा ''आदिशक्ती अभियान '' चा मुख्य हेतु आहे.

या अभियानातून आपल्याला काय साध्य करायचे आहे :

हुंडा आणि बालविवाह यांसारख्या अनिष्ठ प्रथांचे समुळ उच्चाटन केले जाईल. ◀◀ पान ३ वर

## युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांच्या वतीने बीड शहरात १०१ झाडांची लागवड

बीड । प्रतिनिधी

उन्हाळ्यात बीडचा पारा ४४ अंशावर गेल्याने नागरिकांच्या जिवाची लाही-लाही झाली. युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांनी तेव्हाच जिल्ह्यात वृक्षलागवड करण्याचा निर्णय घेतला होता. मे महिन्यात शेवटच्या आठवड्यात चांगला पाऊस पडल्याने त्यांनी चिंच,नारळ,आंबा,जाम,लिंब,वड, पिंपळ यासह सावली, फळ देणारे आणि वर्षानुवर्ष टिकणारे झाडे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांनी लावले. या उपक्रमाबद्दल यांचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.

बीड जिल्हा हा दुष्काळग्रस्त जिल्हा आहे. वृक्ष कमी झाल्याने त्यात अणखी भर पडली. प्रत्येकानी किमान दोन झाडे लावले पाहिजेत असे फक्त सोशल मीडियावर सेट्स ठेवले जाते. प्रत्यक्षात मात्र कृतीत ते उतरत नाही. मात्र युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव ◀◀ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# तिहेरी खूनप्रकरणात पोलिस उपनिरीक्षकास जन्मठेप; ३ लाखांचा दंड

**पुणे । प्रतिनिधी**

शस्त्र व दारूगोळा यांच्या सुरक्षेसाठी असताना शस्त्रागारातून पिस्तुल व मॅगझीन लंपास करत त्याआधारे तिघांचा खून करणार्या पोलिस उपनिरीक्षकास न्यायालयाने जन्मठेपेसह ३ लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली. संजय बळीराम शिंदे (रा. गोपाळवाडी रोड, सरपंचवस्ती, ता. दौंड) असे शिक्षा सुनावलेल्याचे नाव आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश बी. पी. क्षीरसागर यांच्या न्यायालयाने हा निकाल दिला. उसने घेतलेल्या पैशांच्या वादातून दोघांना तर किरकोळ भांडणाच्या कारणावरून एकास असे एकूण तिघांस आरोपीने गोळ्या घातल्याचे तपासात निष्पन्न झाले होते.

१६ जानेवारी २०१८ रोजी दौंड परिसरातील नगरमोरी चौक व जिजामाता नगर परिसरात ही घटना घडली. गोपाळ काळुराम शिंदे (वय ३४, रा. भवानीनगर, ता. दौंड), परशुराम गुरूनाथ पवार (वय २८, रा. वडारगल्ली, दौंड) अनिल विलास जाधव (वय ३४, रा. जिजामाता नगर, लिंगाळी, ता. दौंड) अशी मयत व्यक्तींची नावे आहेत. याप्रकरणी, गजानन काळुराम शिंदे (वय ३२, रा. देवकीनगर, दौंड) यांनी फिर्याद दिली आहे. गोपाळ हे गजानन यांचे भाऊ असून परशुराम हे मेहुणे आहेत. घटनेच्या दिवशी उसनवारी घेतलेले पैसे परत करण्यावरून गोपाळ शिंदे व संजय शिंदे यांमध्ये वाद सुरू होते. याची माहिती मिळाल्यानंतर फिर्यादी त्यांच्या मेहुण्यासह घटनास्थळी दाखल झाले. यावेळी, गजानन यांनी मध्यस्थीकरीत मी पैसे देतो असे सांगून गोपाळ व परशुराम यांना घरी जाण्यास सांगितले. यादरम्यान, रस्ता ओलांडून जात असताना गोळीचा आवाज झाला. यावेळी, गजानन यांनी मागे पाहिले असता संजय याने गोपाळवर गोळी झाडली.

त्यानंतर, त्याठिकाणी असलेल्या परशुराम यांवरही गोळी झाडून संजयने रिव्हॉल्वहर गाडीच्या डिक्कीत टाकून दौंडच्या दिशेने निघून गेला. त्यानंतर गोपाळ व परशुराम यांना दवाखान्यात नेले असताना डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर, संजय याने फिर्यादी यांच्या ओळखीच्या असलेल्या अनिल जाधव याच्या घरी जात घराबाहेर त्याच्यावरही गोळी झाडत त्याचा खून केल्याचे फिर्यादित नमूद करण्यात आले.



याप्रकरणात आरोपीला अटक करत न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करत त्याविरोधात खटला सुरू झाला. याप्रकरणात, सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील राजेश कावेडिया यांनी काम पाहिले. त्यांनी ३२ साक्षीदार तपासले. यामध्ये, चार प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि बॅलेस्टीक एक्सपर्ट आणि डॉक्टरांचा अहवाल महत्त्वाचा ठरला. न्यायालयाने सरकार पक्षासह बचावपक्षाचा युक्तिवाद ऐकून घेत आरोपीला शिक्षा सुनावली.

बॅलेस्टीक एक्सपर्टची अमेरिकेतून रात्री २ वाजता नोंदविली साक्ष

संजय शिंदे हा नगरच्या दिशेने जात असताना त्याला अटक करण्यात आली. अंगझडतीदरम्यान, त्याच्याकडे पिस्तुल, २२ पैकी १२ जिवंत काडतुसे आणि दोन मॅगझीन आढळून आले. दोन्ही घटनास्थळी ज्या दहा पुंगळ्या मिळाल्या त्या तपासणीसाठी बॅलेस्टीक एक्सपर्टकडे पाठविण्यात आल्या. पोलिसांनी जप्त केलेल्या बारा काडतुसांपैकी एकाची तपासणी केली असता त्या घटनास्थळी सापडलेल्या पुंगळ्या संबंधित असल्याचे दिसून आले. याखेरीज, मयताच्या शरीरात ज्या गोळ्या सापडल्या त्या गोळ्या या पिस्तुलातून मारल्या असल्याचा अहवाल बॅलेस्टीक अहवालात होता. याप्रकरणात, सध्या अमेरिकेत कार्यरत असलेल्या बॅलेस्टीक एक्सपर्टची साक्ष अमेरिकेतून व्हीसीद्वारे नोंदविण्यात आली. सकाळी साडे दहा वाजता भारतात न्यायालयीन कामकाज सुरू झाल्यानंतर एक्सपर्ट साक्षीसाठी अमेरिकेतील वेळेनुसार रात्री दोन वाजता न्यायालयात हजर होत होत्या.

आरोपीच्या कृत्याने चिमुकल्यांचे पितृछत्र हरपले

मयत व्यक्तींपैकी गोपाळ यास ९ व ७ वर्षांची दोन मुले आहेत. परशुराम यास ७, ५ आणि २ वर्षांच्या तीन मुली आहेत. तर अनिल यास एक ६ वर्षांची मुलगी आहे. आरोपीच्या कृत्यामुळे या चिमुकल्यांच्या डोक्यावरून पितृछत्र हरविले आहे. संजय हा एसआरपीएफ सेवेत होता. त्यामुळे, नागरीकांचे संरक्ष करणे हे त्याचे कर्तव्य होते. मात्र, त्याने किरकोळ कारणावरून तिघांचा निर्घुण खून केला आहे. कारागृहात असतानाही त्याची वर्तवणूक चांगली नव्हती. आरोपीने केलेला गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा आहे. कायद्याचे रक्षकच भक्षक झाले तर सर्वसामान्यांनी कोणावर विश्वास ठेवायचा. समाजावर कायद्याचा वचक रहावा तसेच समाजात योग्य संदेश जाण्यासाठी आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी अतिरिक्त सरकारी वकील राजेश कावेडिया यांनी केली. दंडाची रक्कम मृतांच्या नातेवाईंकासह शासकीय फंडात

न्यायालयाने आरोपीला तीन लाख रुपयांचा दंड सुनावला आहे. दंडाच्या रकमेपैकी ऐंशी टक्के रक्कम घटनेतील मृत्यूमुखी पडलेल्यांच्या नातेवाईंकना देण्यात यावी. तसेच वीस टक्के रक्कम शासकीय फंडात जमा करावे, असे न्यायालयाने निकालादरम्यान नमूद केले आहे. दंडाची रक्कम न भरल्यास संजय शिंदे यास अतिरिक्त सहा महिन्यांचा साधा कारावास भोगावा लागेल, असेही न्यायालयाने निकालात नमूद केले आहे.

# भूमिअभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपाचा बारावा दिवस; अजूनही तोडगा नाहीच

**पुणे । प्रतिनिधी**

भूमिअभिलेख विभागातील शिरस्तेदार, भूकरमापक, परिरक्षण भूकरमापक यांनी वेतनवाढीसह विविध मागण्यासाठी गेल्या बारा दिवसांपासून सुरू केलेला संप तोडगा न निघाल्यामुळे अजुनही सुरूच आहे. दरम्यान पुणे प्रदेश विभागातील कर्मचा-यांनी सुरू केलेल्या संपाबरोबरच आता अमरावती आणि नागपूर या विभागातील भूमिअभिलेख विभागातील संघटनांनी देखील आता याच मागण्यांसाठी बेमुदत संप सुरू केला आहे. या संपामुळे राज्यातील सर्वच विभागातील मोजण्यांसह इतर कामे खोळबली आहेत. दरम्यान महसूल मंत्र्यांशी चर्चा होणे गरजेचे आहे. असे संघटनेचे अध्यक्ष विजय पिसाळ, सरचिटणीस अजित लांडे, कोषाध्यक्ष सोमनाथ कोरके, उपाध्यक्ष सतिश बाठे यांनी सांगितले.



भूमिअभिलेख विभागाच्या पुणे प्रदेश विभागातील महाराष्ट्र राज्य भूमिअभिलेख कर्मचारी संघटनेच्यावतीने वेतनवाढी बरोबरच इतर प्रलंबित असलेल्या मागण्यांसाठी बेमुदत संप सुरू केला आहे या संपात राज्यातील इतरही संघटना सहभागी झालेल्या आहेत. त्यामुळे आता संपाची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे.

याबाबत माहिती देताना संघटनेचे सरचिटणीस अजित लांडे म्हणाले, वन विभाग, एम. आय. डी.सी. महापालिका विभागात कार्यरत असलेले भूकरमापक यांना आमच्या विभागात कार्यरत असलेल्या भूकरमापकांच्या वेतनात खूपच तफावत आहे.त्याचप्रमाणे सन २०१५ मध्ये तत्कालीन प्रधान सचिव यांच्याशी वेतनवाढीबाबत संघटनेच्या पदाधिका-यांची चर्चा झाली होती .त्यावेळी त्यांनी जमाबंदी विभागाकडून वेतन वाढीचा प्रस्ताव मागितला होता. तो प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आला होता. मात्र त्यावर अजुनहे निर्णय झालेला नाही. ही बाब लक्षात घेऊनच वेतनवाढीसह इतर मागण्यांसाठी बेमुदत संप पुकारण्यात आलेला आहे.

# पुणे शहरात दहशत कायम! पाच महिन्यात ६ तर, वर्षभरात २१ गोळीबाराच्या घटना

**पुणे । प्रतिनिधी**

शांतता प्रिय शहरात कोयत्याचा दहशतीनंतर आता 'ढिशक्यांव-ढिशक्यांव'ची दहशत माजू लागली असून, किरकोळ आणि मनात भिती बसविण्यासाठी देखील गोळ्या झाडल्या जाऊ लागल्या आहेत. शहरात सलग गोळीबाराच्या घटना घडल्यानंतर या गोळीबारांची दाहकता लक्षात येऊ लागली आहे. गेल्या पाच महिन्यात शहरात गोळीबाराच्या ६ घटना घडल्या असून, जीवे ठार मारण्यापेक्षा दहशतीसाठी गोळ्या झाडल्या जात असल्याचेही प्रकार्षाने जानवू लागले असल्याचे पोलिसांचे मत आहे.

पुण्यासारखे शांतता प्रिय शहराची गेल्या काही वर्षात गुन्हेगारी घटनांनी शांतता भंग केली आहे. लाठ्या काठ्यांच्या हाणामारी ते पिस्तूलांचा वापरापर्यंत गेलेली गुन्हेगारी आता दिवसागणीक भयावह रूप धारणकरू लागली आहे. कोयत्याची दहशत मना-मनात निर्माण झालेली असतानाच आता गोळ्यांचा ढिशक्यांव-ढिशक्यांव आवाज देखील मनात भिती निर्माण करू लागला आहे. उपनगरांपासून पुण्याच्या मध्यभागापर्यंत हे आवाज निघू लागले आहेत. गेल्या आठवड्यात शिवसेना (शिंदे गट) युवासेनेच्या जिल्हाप्रमुखाच्या गाडीवर गोळीबार करण्यात आला. नंतर आता किरकोळ कारणावरून पुण्याच्या पेठेत गोळीबाराची घटना मध्यरात्री घडली. दोन्ही घटना या केवळ दहशत माजविण्यासाठी व त्यांच्या मनात भिती निर्माण करण्यासाठी केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासातून समोर आले आहे. सराईतांपासून गुन्हेगारीत पाय ठेवलेल्या नवख्या गुन्हेगारांना देखील आता पिस्तूल सहजारित्या उपलब्ध होत आहेत. तेच त्रासदायक ठरत आहेत.

पिस्तूलांचा वापर वाढला..!

गुन्हेगारीचा कोयता पॅटर्न प्रसिद्ध असताना कोयत्यासोबतच पिस्तूलाने ढिशक्यांव-ढिशक्यांव करण्याचाही पॅटर्न फोफावला आहे. गुन्हेगाऱ्यांच्या मते कोयत्याने आधी तोडायचे अन् मग क्रूरतेसाठी व दहशतीसाठी गोळ्या झाडल्या आहेत. कुख्यात गुंड शरद मोहोळ गोळ्या झाडूनच खून झाला. नंतर माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांचीही गोळ्या झाडून व नंतर कोयत्याने वारकरून खून केला. सोबत पिस्तूलांमधून अधून-मधून दहशतीसाठी ढिशक्यांव-ढिशक्यांवही होते.

परराज्यातून येतात पिस्तूल.

पिस्तूलाचे रॅकेट पुण्यात चालविले जाते. ते परराज्यातून स्वस्थात पिस्तूल आणून दुप्पट किंमतीने विक्री करतात. बक्कळ पैसा या मार्गाने मिळत असल्याने अनेकजण या मार्गावर आले आहेत. बिहार, उत्तरप्रदेश व मध्यप्रदेशातून पिस्तूले आणली जातात. येथे ५ हजारांपासून पिस्तूले आणत तेच पिस्तूल हवे तसे व गरजेनुसार किंमतीने विकली जातात. पुर्वी पुण्यापर्यंत पिस्तूल पुरवणारे एक रॅकेट होते. पुण्यात विक्री करणारे दुसरे रॅकेट. पण, आता परिस्थिती बदलली आहे.

निर्भया कांडची पुनरावृत्ती; प्रायव्हेट पार्टमध्ये लोखंडी अन् लाकडी रॉड, गर्भाशयही शरीराच्या बाहेर; महिलेवर सामूहिक बलात्कार

गोळीबारीच्या घटना..

यापूर्वीच्या काही घटना वाडेबोल्हाईत किरकोळ वादानंतर हवेत गोळीबा. कोथरूडमध्ये पुर्ववैमन्यासातून तरुणाचा खून, गोळीबारही. बिबवेवाडीत वैमनस्यातून जामिनावर सुटलेल्या गुंडावर गोळीबार. कोंढव्यात दोन गुन्हेगारांच्या बैठकीत चुकून ते झालेला गोळीबार. जिल्हा प्रमुखाच्या गाडीवर गोळीबार. मंगळवार पेठेत गोळीबाराची घटना यापूर्वी घडल्या आहेत.

# सीबीएसई शाळांमध्ये आता मराठी भाषेचे धडे; अंमलबजावणीसाठी समिती स्थापन

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) देशभरातील आपल्या सर्व शाळांमध्ये भाषा शिक्षणविषयक धोरण जारी केले आहे. त्यामुळे सीबीएसई शाळांमध्ये पायाभूत स्तरापासून मातृभाषा किंवा राज्यभाषा शिकविणे अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्यातील सीबीएसई शाळांमध्ये मराठी भाषा शिकवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.




प्राथमिक भाषा ही विद्यार्थ्यास सर्वाधिक परिचित म्हणजेच मातृभाषा असावी. शक्य नसल्यास राज्यभाषा वापरली पाहिजे. मुलाला दुसऱ्या भाषेत मूलभूत साक्षरता येईपर्यंत ही भाषा सर्व विषयांसाठी शिक्षणाचे माध्यम म्हणून देखील काम करेल, असे सीबीएसईने स्पष्ट केले आहे.

सीबीएसई शाळांसाठी मे अखेरीस मातृभाषेच्या अंमलबजावणीसाठी समिती स्थापन करण्यात येणार आहे. ही समिती विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीचे मूल्यांकन करेल, अभ्यासक्रमात आवश्यक बदल करेल आणि योग्य शिक्षण साहित्य निवडण्यासाठी मार्गदर्शन करेल. शिक्षकांनी जुलैपर्यंत बहुभाषिक शिक्षणाचे विशेष प्रशिक्षणदेखील पूर्ण केले पाहिजे.

तीन ते आठ वयोगटांतील मुलांना त्यांच्या मातृभाषेत मूलभूत साक्षरता विकसित करण्याचे उद्दिष्टही ठेवण्यात आले आहे.

पूर्वप्राथमिक ते इयत्ता दुसरीपर्यंत मुलांच्या शिक्षणासाठी मातृभाषा किंवा राज्यभाषा एक अनिवार्य भाषा म्हणून शिकविली जाणार आहे. राज्यातील शाळांमध्ये इंग्रजी आणि हिंदी शिकवले जात असले, तरी मराठी शिकवणे अनिवार्य होईल. मुलांच्या प्रारंभिक वयात मातृभाषेतील शिक्षणामुळे मुलांच्या मानसिक आणि भावनिक विकासाला चालना मिळणार आहे.

# लिफ्टमध्ये अडकलेल्या जेष्ठ नागरिकाची अग्निशमन दलाकडून सुखरूप सुटका



**पुणे । प्रतिनिधी**

काल २६ मे रात्री १२ वाजता मार्कटयार्ड येथील नंदनवन हॉटेल व लॉजिंग येथे चार मजली इमारतीत दुसर्या मजल्यावर एक जेष्ठ नागरिक लिफ्ट बंद पडल्याने सुमारे अर्धा तास अडकल्याची माहिती गंगाधाम अग्निशमन केंद्राला मिळाली. त्यानंतर या ठिकाणी तातडीने अग्निशमल दलाचे वाहन रवाना करण्यात आले.

जवान घटनास्थळी पोहचताच प्रथम लिफ्टमध्ये अडकलेल्या जेष्ठ नागरिकाशी संवाद साधत त्यांची लवकरच सुटका करू, असा धीर देत वर लिफ्ट रूममधून काही जवानांनी मॅन्युअली फिरवत एकमेकांशी चर्चा करत लिफ्टमधून सदर जेष्ठ नागरिकाची अवघ्या ५ मिनिटात सुखरूप सुटका करत आपले कर्तव्य बजावले. अगदी वेळेत अग्निशमन दल पोहचत केलेल्या कामगिरीबद्दल जेष्ठ नागरिक हॉटेल मॅनेजर रवी कासेगावकर यांनी जवानांचे आभार मानले.

या कामगिरीत गंगाधाम अग्निशमन केंद्रातील तांडेल मनीष बोंबले, वाहनचालक प्रसाद शिंदे व जवान ज्ञानेश्वर कदम, अक्षय मोंढे, धनंजय भिसे, मंदार नलावडे, अजित टेकावडे यांनी सहभाग घेतला होता.

# पुणेकरांनो लक्ष द्या...! नदीतील विसर्गाच्या २ तास आधी वाजणार भोंगा; यंत्रणा सुरु ठेवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मान्सनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. राज्यातील पश्चिम महाराष्ट्राला तर पावसाने अक्षरक्षाः झोडपून काढलं आहे. पुणे शहरात देखील दमदार पाऊस कोसळत आहे. मान्सून राज्यात वेळेआधीच दाखल झाला असून येत्या काही दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

यामुळे पावसाच्या नियोजनाला सुरूवात करण्यात आली असून, धरणातून करण्यात येणाऱ्या विसर्गाआधी नागरिकांना २ तास अगोदर सूचना मिळणार आहेत. विसर्ग करताना इशारा यंत्राच्या स्वरुपात भोंगा वाजवला जाणार आहे. पाणी शिरण्याचा धोका असलेल्या ठिकाणी कायमस्वरुपी ही यंत्रणा सुरू ठेवावी, त्याची माहिती पालिकेच्या नियंत्रण कक्षाने नागरिकांना द्यावी, अशी सूचना पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

यंदा मान्सूनचे आगमन महाराष्ट्रात लवकर झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून सर्व यंत्रणांना नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गेल्या वर्षी पुण्यामध्ये जोरदार पाऊस झाला होता. यामुळे धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करण्यात आला होता. या पाण्यामुळे येथील नदीकाठच्या गावांना मोठा फटका बसला होता. लोकांच्या घरात पाणी शिरले होते. अनेक वाहने पाण्यात वाहून गेली होती. मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं होतं. यंदाचा पावसाळा अधिक असल्याने आता प्रशासन अलर्ट मोडवरून आले आहे. तशा सचूना पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी तशा सूचना प्रशासनाला केल्या आहेत.

सतर्क राहण्याचा इशारा

गेल्या काही दिवसांपासून कोसळत असणाऱ्या पावसाने पुणे जिल्ह्यात तीन बळी घेतले आहेत. कर्वेनगर भागामध्ये झाड कोसळून एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. खेड तालुक्यात भामा आसखेड धरणात मासेमारी करणाऱ्या तरुणाचा वीज कोसळून दुर्देवी मृत्यू झाला आहे. तर दौंड शहरात एका महिलेचा मृत्यू झाला आहे. येत्या काही दिवसात पुण्यात आणि जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरूच राहणार असल्याचे सांगण्यात आले असून, पुणे शहराला आज २७ मे रोजी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. आपत्ती विभागाकडून नागरिकांना सतर्क राहण्याचा सूचना करण्यात आल्या आहेत.

# ११वीच्या इन-हाऊस कोट्यातील प्रवेशाबाबतचे सुधारित नियम तात्काळ रद्द करावेत - डॉ. गजानन एकबोटे याची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

अकरावी प्रवेश प्रक्रियेतील संस्थांतर्गत कोट्यातील (इन-हाऊस) प्रवेशासाठीचा सुधारीत नियम विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा आहे. त्यामुळे हा सुधारित नियम ताबडतोब रद्द करण्यात यावा आणि पूर्वीच्याच नियमाप्रमाणे अकरावी प्रवेश प्रक्रिया राबवावी, अशी मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी शालेय शिक्षणमंत्र्यांकडे केली आहे.



यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील अकरावी प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. या प्रवेश प्रक्रियेमध्ये अकरावी प्रवेशासाठी राखीव असणाऱ्या पाच टक्के इनहाऊस कोट्यातून विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावे लागतात. यापूर्वीच्या कालावधीमध्ये इनहाऊस कोट्यामध्ये एकाच संस्थेची माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात असणे बंधनकारक नव्हते. त्यामुळे एकाच संस्थेच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याच संस्थेच्या शहरातील किंवा प्रतिष्ठित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इन हाऊस कोट्यातून प्रवेश घेता येणे शक्य होते.

मात्र, यंदाच्या वर्षी संस्थेची माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात नसतील अशा शाळांमधील दहावी विद्यार्थ्यांना इन हाऊस कोट्यातून त्याच संस्थेच्या अकरावीमध्ये प्रवेश घेता येणार नाही, असा नियम केला आहे. हा नियम अन्यायकारक आहे. अकरावीच्या इनहाऊस कोट्यातील प्रवेशासाठीचा सुधारित नियमाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी डॉ. एकबोटे यांनी शालेय शिक्षण विभागाकडे केली आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी इनहाऊस कोट्यासंदर्भात संस्थाचालकांचे काही म्हणणे असल्यास ते ऐकून घेतले जाईल आणि काही बदल केले जातील, असे आश्वासन पुण्यात दोन दिवसांपूर्वी दिले होते. आता शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. एकबोटे यांनी या विषयाकडे लक्ष वेधले आहे. त्यामुळे याबाबतचा ठोस निर्णय प्रवेश फेरी सुरु होण्यापूर्वी व्हावी, अशी मागणी होत आहे.

# पुणेकरांसाठी गुडन्यूज! खडकवासला धरण साखळीत पाणीसाठा वाढण्यास सुरूवात

**पुणे । प्रतिनिधी**

मान्सूनपूर्व पावसाची गेल्या दोन दिवसांपासूनच्या दमदार हजेरीमुळे खडकवासला धरण साखळीतील चार धरणांमध्ये पाणी वाढण्यास सुरूवात झाली आहे. दरवर्षी जूनच्या मध्यापासून या धरणांमध्ये पाणीसाठा वाढण्यास सुरूवात होते, मात्र या वर्षी २५ मेपासूनच धरणांमध्ये पाण्याची आवक सुरू झाली असून, २७ मेपर्यंत या चारही धरणांमधील पाणीसाठा हा ५.७४ टीएमसी इतका झाला आहे.

खडकवासला धरण साखळीतील टेमघर, पानशेत, वरसगाव व खडकवासला ही धरणे मागील वर्षी १०० टक्के भरली होती. मात्र यंदा मार्च आणि एप्रिल महिन्यात उन्हाचा कडका वाढल्याने, शहरात पाण्याची मागणी वाढली होती. परंतु, शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत पहिल्यांदाच मे महिन्यातच वाढ होण्यास सुरुवात झाली आहे.

सोमवारी दिवसभर घाटमाथ्यासह, धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाल्याने पाणीसाठा वाढण्यास सुरुवात झाली. दरवर्षी मान्सूनच्या आगमनानंतर दहा ते बारा दिवस सलग पाऊस झाला तरच जूनच्या अखेरीस पाणीसाठा वाढण्यास सुरुवात होते. मात्र, यंदा अवकाळी पावसाने मान्सूनच्या आगमनाच्या पहिल्याच दिवशी पाणीसाठ्यात वाढ केली आहे.

एकट्या सोमवारी म्हणजे २६ मे रोजीच मान्सूनच्या आगमनाच्या पहिल्याच दिवशी या चारही धरणांमध्ये २८ एमएलडी पाण्याची वाढ झाली असल्याची माहिती पाटबंधारे विभागाकडून देण्यात आली आहे. या चारही धरणांत १५० मिमी पेक्षा अधिक पाऊस झाल्याने २६ मे पासूनच पाणीसाठा वाढण्यास सुरुवात झाली आहे. रविवारी सायंकाळी या चारही धरणांचा पाणीसाठा ५.६६ टीएमसी होता. तर दिवसभरात महापालिकेचा शहराचा पाणी पुरवठा तसेच कालव्यातून दिवसभर पाणी सोडण्यात आल्यानंतरही हा पाणीसाठा आज सकाळी आठपर्यंत ५.७४ टीएमसी झाला आहे.



सोमवारी सकाळी आठ वाजल्यापासून आज म्हणजेच २७ मेच्या सकाळी आठपर्यंत खडकवासला धरण परिसरात १६ मिमी, पानशेत धरण परिसरात ९९ मिमी, वरसगाव धरण परिसरात ९२ मिमी तर टेमघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ७० मिमी पावसाची नोंद झाली आहे.

या चारही धरणांची उपयुक्त पाणीसाठवण क्षमता २९.५० टीएमसी आहे. या धरणातून शहरासह, जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजना आणि सिंचना योजनांसाठी पाणी दिले जाते. त्यामुळे मागील काही वर्षांप्रमाणेच जून महिन्यातच कपात ओढावण्याची शक्यता होती. मात्र, यंदा मे महिन्यातच पाणी वाढण्यास सुरुवात झाली.

जलसंपदा विभागाच्या भीमा खोरे पुरनियंत्रण कक्षाने दिलेल्या माहितीनुसार, भीमा खोर्यातील २६ धरणांच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या दोन दिवसांपासून पावसाची दमदार हजेरी आहे.

वीर धरण ४० टक्के भरले

वीर धरण पाणलोट क्षेत्रात झालेल्या जोरदार पावसामुळे वीर धरण ४०.६५ टक्के भरले असून, धरणात उपयुक्त पाणीसाठा ३.८२ टक्के इतका आहे. गेल्यावर्षी याच तारखेला म्हणजे २७ मे रोजी १३ टक्के भरलेले होते. तर पावसाची शून्य टक्के हजेरी होती.